# माणूस

शनिवार
२० मार्च १९७१
चाळीस पैसे



We are a Muslim nation
and
shall never accept communism
but
friendship with China
is dictated
by the facts of
geography and politics.

– शेख मुजीबूर

शनिवार २० मार्च १९७१

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : एकाहत्तरावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशाची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

◻ 'माणूस'चा निवडणूक विशेषांक वाचला. आवडला. एकूणच निवडणूक काळातील माणूसचे अंक पूर्वीच्या अंकांपेक्षा अधिक चांगले व ताजे वाटले. निवडणूक वार्तापत्रे एकांगी वाटली नाहीत. सध्याच्या प्रचारी वर्तमानपत्रीय वार्तापत्रांपेक्षा तर ती फारच उजवी वाटली. अर्थात माणूसचे अंदाज चुकले हे मात्र मान्य करायलाच हवे. मुंबईबाबत तर ही गोष्ट फारच लक्षात आली. तरी पण या काळात विचारांना फार चांगले खाद्य पुरवलेत याबद्दल धन्यवाद.

१३ मार्च, १९७१ — रमेश वालावलकर, माहीम

◻ आपण निवडणूक स्पेशल अंक काढून निवडणुकीसंबंधीचे अंदाज व उमेदवारांचे कर्तृत्व उत्तम रीतीने आमच्यासारख्या वाचकांपुढे स्पष्टपणे मांडलेत याबद्दल धन्यवाद. या अंकाचे मुखपृष्ठ उत्तम. चित्रकार कोण?

१५ मार्च, १९७१ — ग. ल. जोग, पुणे

[ मुखपृष्ठ : श्याम जोशी. मुंबई., छायाचित्रकार : अधिक शिरोडकर ]

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक,

# दुसरे पर्व
# वचनपूर्तीचे राजकारण

त्रि. शं. पारगावकर

लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका नुकत्याच संपल्या. निवडणुकीच्या निमित्ताने यावर्षी निरनिराळ्या पक्षांचा जो प्रचार झाला तो नवीन होता. विशेषतः नवकाँग्रेसचा आणि जनसंघाचा प्रचार डोळ्यात भरेल आणि लक्षात राहील असा झाला. लोकसभेचा प्रचार असून देखील या देशातील शहरे आणि खेडी प्रचाराने ढवळून निघाली होती.

पूर्वी विधानसभा आणि लोकसभा निवडणुका एकत्र होत असत, तेव्हा जवळचे प्रश्न आणि दूरचे प्रश्न यामध्ये मतदार विशेष तरतमभाव करताना दिसत नसे. निवडच केला जात नसे असा नाही पण उमेदवाराच्या निवडीबाबत दोन निराळे दृष्टीकोन स्वच्छपणे प्रतित होताना दिसत नसत.

या निवडणुकीत लोकसभेच्या उमेदवारांकडे वरील दृष्टीने पाहण्याचा मतदारांचा प्रयत्न दिसला. मुंबईतून आणि पुण्यातून शिवसेना ज्या प्रकारे धुवून निघाली त्यावरून हे सिद्ध झाले. तसेच काही विरोधी पक्षांचीही गत केविलवाणी झाली आणि काहींवर तर मतदारातून उठण्याची पाळी आली, हे या निवडणुकीतील वैशिष्ट्य समजावे लागेल.

उ. कम्युनिस्ट पक्ष आणि जनसंघ यांनी आपले बळ राखले आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने मात्र या निवडणुकीत प्रगति केल्यासारखे दिसत आहे. तरी पण सर्व विरोधी पक्षांची या निवडणुकीत एकंदरीने दैनाच उडालेली दिसते. सर्वांत केविलवाणी परिस्थिती झालेली आहे ती संघटना काँग्रेसची. 'आमची तीच खरी काँग्रेस', आणि 'इंदिरा हटाव' या त्यांच्या दोन आवडत्या घोषणा होत्या. निजलिंगप्पा, स. का. पाटील, मोरारजी आणि अतुल्य घोष यांचा हटवादीपणा जनतेला एवढा खुपला की मोरारजी आणि कामराज सोडून तिने त्यांचे सारे मोहरे या निवडणुकीत गारद करून टाकले.

बरे दुसरे दुखणे असे झाले की त्यांना जनतेच्या नावानेही बोटे मोडता येईनात! कारण हेच लोक अखंड कॉंग्रेसमध्ये बहुमताने निवडून येत होते ना? तरीही पण निवडणुकीत काही काळेबेरे आहे असे ते म्हणून दाखवितातच. एवढेच की शिवसेना प्रमुखाप्रमाणे ते बेजबाबदार बरळले नाहीत!

या निवडणुकीत चमत्कार घडला असे एकंदरीने मत व्यक्त केले जाते. परंतु त्यांना या निवडणुकीतील निकाल मानवला नाही त्याच लोकांचे प्रामुख्याने असे मत आहे. वास्तविक १९५२, ५७ आणि ६२ सालातील निवडणुकांचे निकाल तरी काय होते? तेव्हाही कॉंग्रेसला असेच प्रचंड बहुमत मिळालेले होते. तेव्हा नेतेपदी आणि कॉंग्रेसच्या राजकारणात पंडित नेहरूंसारखी अलौकिक प्रतिमेची व्यक्ती होती. ते खरे लोकप्रतिनिधि होते. लोकांनी त्यांच्या चुकांसकट त्यांना आपला नेता मानलेले होते. आणि लोक ते म्हणतील त्या माणसाला निवडून देत असत. वास्तविक कृष्ण मेनन यांचा मुंबईशी काय संबंध होता? पण नेहरूंनी त्यांना १९५७ साली मुंबईतून उभे केले आणि मेनन तेथून निवडून आले. अर्थात नेहरूंचा हा निर्णय चुकीचा ठरला. मेनन हा गृहस्थ किती पोकळ आणि भंपक आहे हे १९६२ साली सिद्ध झाले.

येथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. ती म्हणजे नेहरूंची जनमानसावर जेवढी जबरदस्त पकड होती तेवढीच जनमानसाचीही नेहरूंवर होती. हीच जनता ६२ साली नेहरूंवर उठली आणि तिने लक्षावधी मुखातून मेननचा राजिनामा मागितला. आणि नेहरूंनी जनतेचा तो कौल मानला. तीच गोष्ट महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळीही दिसून आली. उघडया मोटारीतून लोकांची फुले अंगावर उधळून घेत जाणाऱ्या या लोकनेत्याला तेव्हा प्रतापगडाला बंद मोटारीतून जावे लागले होते!

यातून एक गोष्ट सिद्ध होते की या नेत्याचे जीवन लोकजीवनाशी निगडित झालेले होते. तीच गोष्ट आज इंदिरा गांधींच्या बाबतीत दिसू लागलेली आहे. नाहीतर राजा कुळकर्णीसारख्या व्यक्ती एरवी निवडून येत्या ना. बाईंनी आपल्या शब्दांना मोल प्राप्त करून घेतले आहे. विरोधी पक्षांना ही गोष्ट कितीही अप्रिय वाटत असली तरी परिस्थितीची हेटाळणी न करता तिचा अभ्यास केला पाहिजे. शेवटी जनमानस ही फार मोठी शक्ती असते ही गोष्ट भारतीय नेत्यांना तरी समजावून सांगण्याची जरूर नसावी. पाकिस्तानसारख्या हुकूमशाही देशात देखील केवळ जनतेच्या शक्तीवर मुजिबूर रहेमान याह्याखानशी टक्कर देऊ शकतो ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. आणि त्याचबरोबर हीही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की ज्या मुसलमान जमातींनी म. गांधींची आणि त्यांच्या तत्वांची आजवर अवहेलना केली त्याच तत्वांच्या जोरावर मुजिबूर रहेमानसारखी मुसलमान व्यक्ती स्वातंत्र्यासाठी लढा देत आहे!

या निवडणुकीत हरलेले पक्ष इतके निराश झालेले आहेत की त्या निराशेच्या भरात ते नवकाँग्रेसला बहुमताने निवडून देणाऱ्या जनतेस अज्ञानी आणि मूर्ख म्हणत आहेत! अर्थात हा जनतेचा अधिक्षेप नसून त्या त्या पक्षांचा अधःपात आहे असे समजण्यास हरकत नाही. ज्या जनतेने आज नवकाँग्रेसला एवढया प्रचंड बहुसंख्येने निवडून दिले आहे त्याच जनतेने १९६७ साली काँग्रेसचा होद्या केला होता ही गोष्ट विसरून चालणार नाही!

विरोधी पक्षात कोणताही एक पक्ष एवढा बलवान नाही की जो उद्या राज्यावर येऊ शकेल. तसेच ६७ सालच्या परिस्थितीवरून हेही सिद्ध झालेले आहे की निरनिराळ्या पक्षांच्या आघाड्याही जनतेला उत्तम कारभार देऊ शकत नाहीत. आघाड्यांचे राजकारण या देशात साफ फसलेले आहे. द्र मु. क. सारखा मागासलेला पक्षदेखील आघाडयांपेक्षा बरा असे जनतेचे स्पष्ट मत झालेले आहे हे कशाचे लक्षण आहे?

म्हणजे आजच्या विरोधी पक्षांचे स्वरूप कसे आहे?

मद्रास सोडून कुठल्याही प्रांतातदेखील राज्यकारभार करू शकेल अशी कोणत्याही विरोधी राजकीय पक्षाची कुवत नाही. तर मग मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकारे स्थापू शकतील एवढया शक्तीची अपेक्षाच करायला नको ही एक गोष्ट. दुसरी अशी की निरनिराळे पक्ष एकत्र येऊन काही विधायक करू शकतील म्हणावे तर तीही आशा मावळलीच आहे. ६७ सालाने या गोष्टीवर शिक्कामोर्तब केले आहे. शिवाय या नव्या निवडणुकीच्या वेळी बडी आघाडी स्थापण्याचा जो केविलवाणा प्रयत्न झाला आणि तिचा निरनिराळ्या ठिकाणी जो फज्जा उडाला ही गोष्ट जनतेच्या लक्षात आलेली नाही अशी का विरोधी पक्षांच्या नेत्यांची कल्पना आहे? हा एक मुद्दा झाला.

दुसरी गोष्ट ही कोणी कोणाशी युती करावी! संघटना काँग्रेसने स्वतंत्र पक्षाशी! आणि जनसंघाने संघटना काँग्रेसशी! गेल्या दीड तपाच्या वर ज्या पक्षांच्यामधून विस्तव जात नव्हता त्या पक्षांनी आपसात हातमिळवणी करावी? इंदिरा काँग्रेसमधून फुटून निघाल्याबरोबर अशी कोणती गोष्ट घडली की जीमुळे या पक्षांनी एकत्र यावे?

आणि एकत्र येऊन संयुक्त कार्यक्रम काय आखावा तर 'इंदिरा हटाव!' ह्या लोकशाही राज्यपद्धतीत अशा कार्यक्रमाला वाव नसतो ही साधी प्राथमिक गोष्टदेखील या महाभागांच्या लक्षात येऊ नये याचे आश्चर्य वाटते. संघटना काँग्रेसच्या झाडून सर्व नेत्यांच्या तोंडात फक्त 'इंदिरा हटाव' हा घोष होता. या पचाळ आणि घाणेरडया प्रचाराचे विष त्यांच्याच अंगावर उतलेले आज दिसत आहे.

इतकी वर्षे जनसंघ हा पक्ष स्वतःच्या हिंमतीवर आणि ध्येय धोरणावर आगेकूच करीत होता. त्याची ध्येय धोरणे फार लोकशाहीप्रधान आणि आधुनिक होती

असा येथील कोणत्याही सूत्र महाराचा दावा नाही. पण बदलत्या परिस्थितीनुसार परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता या पक्षात आहे हे अनेक प्रसंगावरून मगे दिसून आलेले आहे. त्यामुळे आज जरी जनतेला हा पक्ष आधुनिक वाटत नसला तरी त्याविषयी जनतेच्या मनात निश्चित प्रेम आहे. त्याची कार्यकृत धिमेपणानें असली तरी तो निश्चित आहे आणि जनतेची सेवा करण्याची खरी तळमळ या पक्षात दिसून येते म्हणून त्याच्या दोषांकडेदेखील जनता कठोरपणे पाहात नाहीं. परंतु असे असले तरी आर्ष जीवनमूल्यांना आणि ऐतिहासिक स्वप्नांना कवटाळीत बसून त्याला आजच्या आधुनिक जगात प्रवेश करणे फार जड जाणार आहे.

त्यात पुन्हा या मध्यावधि निवडणुकांचे निमित्ताने या पक्षाने व्यक्तिद्वेषाच्या संघटना कांग्रेस आणि जनता द्वेष्ट्या स्वतंत्र पक्षाशी जी युति केली ती फार घातक ठरली आणि त्यामुळेच त्याला आपले पूर्वीचे लोकसभेतील संख्याबळही गमवावे लागले ! केवळ दुसऱ्याच्या विजयावर बोटे न मोडता हा पक्ष आत्मसंशोधन करील अशी अपेक्षा करू या.

नवकांग्रेसने मध्यावधि निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळविले याचे श्रेय इंदिरा गांधी यांचेकडेच जाते याविषयी कोणाच्याही मनात मुळीच संभ्रम असता उपयोगी नाही. आणि पक्षभंगाच्या अगोदर आणि नंतरही त्यांनी कांग्रेसमधील जुन्या खुद्दी धेंडाविषयी जी तक्रार केली होती ती किती खरी होती हे त्यांनी या निवडणुकीच्या निमित्ताने सिद्धच करून दाखवले आहे. बँक राष्ट्रियीकरण आणि संस्थानिकांचे तनख यांच्या विषयी संघटना कांग्रेसची पूर्वीची वक्तव्ये आणि लोकसभेत तिने घेतलेली प्रत्यक्ष भूमिका यावरूनच या पक्षाच्या दुटप्पी धोरणाचे जनतेला दर्शन घडलेले आहे.

अर्थात नवकांग्रेसचा प्रचंड विजय विरोधी पक्षांना जसा घातक ठरला आहे तसाच तो इंदिरा बाईंनाही घातक ठरण्याची भीति आहे. एवढा मोठा विजय देखील पचविणे महाकठीण काम असते. शिवाय आज परिस्थिती अशी आहे की लोकसभेत विरोधी पक्षांची संख्या आणि शक्ति असून नसल्यासारखीच आहे. त्यामुळे राज्यकर्त्या पक्षामध्ये हुकुमशाहीवृत्तीचा शिरकाव होण्याची भीति निर्माण झाली आहे. आता इंदिरा कांग्रेसला ताळ्यावर ठेवण्याचे काम लोकसभेतील विरोधी पक्षाच्या हातात राहिले नसून ज्या लोकांनी त्यांना निवडून दिले आहे त्यांनाच ही कामगिरी बजवावी लागेल.

शिवाय विजय मिळविणे हा एक टप्पा झाला. तो टप्पा बाईंनी जिंकला पण त्याही पुढची अवघड चढण म्हणजे आता वचनपूर्तीच्या राजकारणाचे पर्व सुरू होत आहे. आणि सर्वात कठीण कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे वचनपूर्तीचे राजकारण. त्या राजकारणात नवकांग्रेस किती आणि कशी यशस्वी होते हे आता पहावयाचे आहे !

□ □ □

बंगाल–बंधू

# शेख मुजीबूर रहमान

रवींद्र पिंगे

शब्दवेल्हाळ प्रास्ताविकाचा घोळ न घालता शेख मुजीबूर रहमानची सर्वसाधारण हकीगत प्रथम सांगतो. नंतर त्यांच्या निरीक्षणांबद्दल सांगतो.

पूर्व पाकिस्तानातल्या फरीदपूर जिल्ह्यात गोपाळगंज गावी एका मध्यमवर्गी कुटुंबात मुजीबूरचा जन्म सतरा मार्च एकोणीसशे वीस साली झाला. म्हणजे आज मुजीबूरचे बावन्नावे वर्ष चालू आहे. वकिलीची पदवी त्याने मिळवली आहे. मात्र प्रत्यक्ष वकिली अशी त्याने कधीच केली नाही. तो विवाहीत असून त्याला चार मुलं आहेत. सर्वात मोठी मुलगी. तिचं लग्न झालेलं आहे. तिच्या मागची दुसऱ्या क्रमांकाची मुलगी सध्या लंडनला शिकत आहे. उरलेली दोन मुलं डाक्क्याला अभ्यास करतात. मुजीबूरचं घर डाक्का शहरातल्या धनगंज विभागात आहे. त्याचे आईबाप हयात आहेत. त्याची बायको एक आधुनिक बंगाली गृहिणी आहे. शाळा कॉलेजात असल्यापासूनच त्याला राजकीय कामाची गोडी लागली. ऐन उमेदीत, म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात, गांधीवादी विचारसरणीचा त्याच्यावर पगडा होता. नंतर तो मुस्लीम लीगचा कार्यकर्ता झाला. ' पाईप ओढत फिरणारा मुजीब ' अशी त्याची तो विद्यार्थी-नेता असताना ख्याती होती. पाकिस्तानच्या निर्मितीत आपण भाग घेतल्याचा त्याला अभिमान वाटतो. त्याची अंगकाठी उंच, सशक्त आणि ताठ आहे. वक्ता म्हणून तो नामी आहे. अबालवृद्धांशी तो प्रेमाने वागतो. बंगाली भाषा आणि बंगाली संस्कृतीबद्दल त्याला जन्मजात उमाळा आहे. पूर्व पाकिस्तानचा उल्लेख तो नेहमी ' बांगला देश ' असाच करतो. धनगंजला त्याच्या बिऱ्हाडी गरीब, अनवाणी शेतकऱ्यांची रीघ लागलेली असते. गरीबांची भलाई जोडण्याकडे

त्याचं लक्ष असतं. विचाराने तो प्रागतिक आहे. त्याची राजकीय विचारसरणी उजवीकडे झुकणारी आहे.

पाकिस्तानची निर्मिती झाल्यानंतर दोन वर्षात मुस्लीम लीगबाबत त्याचा भ्रमनिरास झाला. म्हणून बंगाली संस्कृती, बंगाली भाषा आणि बंगाली जनता ह्यांचं कल्याण निधर्मी पातळीवरून पाहाणारी 'अवामी लीग' ही नवी संघटना त्याने १९४९ साली पूर्व पाकमध्ये सुरू केली. सुन्हावर्दीला त्याने आपलं राजकीय गुरुस्थान दिलं आणि ह्या नव्या अवामी लीगचा नेता बनवलं. 'अवामी' म्हणजे जनता किंवा प्रजा. लीग म्हणजे संघटना किंवा पक्ष. १९५४ साली तो पूर्व पाकिस्तानातल्या प्रांतिक विधानसभेच्या निवडणुकीत अवामी लीगच्या तिकिटावर तो निवडून आला. नंतर पाकिस्तानच्या राष्ट्रीय कायदेमंडळावरही त्याची निवड झाली. सुन्हावर्दी पाकिस्तानचा पंतप्रधान झाल्यावर पूर्व पाकिस्तानात अतुर रेहमान खान ह्यांचं मंत्रिमंडळ चौपन साली स्थापन झालं. ह्या प्रांतिक मंत्रिमंडळात मुजीबूर व्यापारमंत्री झाला. पूर्व पाकचा व्यापारमंत्री म्हणून तो चीनमध्ये पाकिस्तानचं सदिच्छा मंडळ घेऊन आला होता. चीनहून परतल्यानंतर मुजीबूर पाकिस्तानचा व्यापारमंत्री ह्या नात्याने एक सदिच्छा मंडळ घेऊन भारतातही आला होता. त्यावेळचे राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांना भेटीदाखल म्हणून त्याने पूर्व पाकिस्तानातल्या सिल्हेट भागातल्या खास नारिंगी रंगाच्या मधाची बाटली दिली होती. ती भेट देताना ती 'बाँगला–देशा'ची वस्तू आहे असं त्याने सांगितलं. राजकीय वर्तुळात फिरताना असा संकुचित, प्रांतीय दृष्टिकोन व्यक्त केल्याबद्दल पश्चिम पाकिस्तानच्या 'डॉन' ह्या वृत्तपत्राने त्याच्यावर त्यावेळी आग पाखडली होती.

राजकीय पक्षाचं प्रत्यक्ष मंत्रिमंडळावर किती दडपण असावं ह्याबाबत मुख्य मंत्र्याशी न जुळल्यामुळे 'प्रकृतीच्या कारणास्तव' त्याने ३१ मे ५७ रोजी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. सुन्हावर्दीने त्याला आपला खास वैयक्तिक दूत म्हणून रशिया, इग्लंड व अमेरिकेच्या दौऱ्यावर १ सप्टेंबर १९५७ रोजी पाठवलं. पण सुन्हावर्दी मंत्रिमंडळच कोसळल्याची तार त्याला जिनेवात मिळाल्यामुळे आपला दौरा तसाच अर्ध्यावर टाकून तो पूर्व पाकिस्तानात परत आला. अवामी लीगचा सरचिटणीस म्हणून तो काम करू लागला, पण खुद्द अवामी लीगचे अध्यक्ष मौलाना अबदूर रशिद तारकावागीश ह्यांच्याशीच बेबनाव झाल्यामुळे त्याने आपल्या सरचिटणीसपदाचा ३ एप्रिल ५८ रोजी राजीनामा दिला. सुन्हावर्दीने पुन्हा मध्यस्थी केल्यावर दोन दिवसांनी त्याने आपला राजीनामा मागे घेतला. मग सुन्हावर्दीने पुन्हा त्याला आपला खास वैयक्तिक दूत म्हणून ७ एप्रिल ५८ रोजी इंग्लंड, अमेरिका व जपान ह्या देशांच्या दौऱ्यावर पाठवलं.

पूर्व पाकमध्ये फुटीर वृत्तीला खतपाणी पुरविल्याचा ठपका ठेवून लष्करी प्रमुख

पदावर आरूढ झालेल्या अयूबखानने मुजीबरला १२ ऑक्टोबर ५८ रोजी प्रत्यक्षात कोणतेही लेखी कारण न देता 'पूर्व पाकिस्तान सुरक्षा वटहुकुमा 'खाली अटक केली. हा त्याचा पहिला तुरुंगवास. दीड वर्ष तो कारावासात होता. त्याच्यावर नंतर सहा गुन्ह्यांची फिर्याद लावली. अखेरीला त्याच्यावरचे आरोप नाशाबित झाल्यामुळे साठ सालच्या जानेवारीत त्याची मुक्तता करण्यात आली.

पुन्हा ११ सप्टेंबर ६० रोजी त्याला अटक करण्यात आली. ह्यावेळी त्याच्यावर 'सत्तेचा गैरवापर' केल्याचा आरोप ठेवण्यात आला. काझी अबु नासेर नावाच्या एका कंपनीच्या मॅनेजिंग एजंटासाठी लाभाच्या आशेने अवैध कारवाया केल्याचा हा आरोप होता. त्यासाठी दोन वर्षं साधा तुरुंगवास, अधिक पाच हजार रुपये दंड व दंड न भरल्यास आणखी सहा महिने साधी सजा, अशी शिक्षा फर्मावण्यात आली. ह्या आरोपाचा त्याने इन्कार करून आपल्यावर व आपल्या पक्षावर शितोडे उडविण्याचा व आपल्या चारित्र्यहननाचा लष्करी सरकार प्रयत्न करीत असल्याचा त्याने पुनरुच्चार केला. त्याचा काहीही उपयोग झाला नाही.

१९६२ साली कोणतेही कारण न देता अयुबने त्याला पुन्हा सहा महिने तुरुंगात डांबलं. हा त्याचा तिसरा कारावास.

सुऱ्हावर्दीच्या मृत्यूनंतर १९६४ सालापासुन मुजीबूरने पूर्व पाकिस्तानात अवामी लीगच्या पुनरुज्जीवनाला वाहून घेतलं. पाकिस्तानच्या अध्यक्षीय निवडणुकीत त्याने आयुबखानविरूद्ध कु. फतिमा जिनाला जाहीर पाठींबा दिला. त्यानंतर पूर्व पाकिस्तानाचे रक्तशोषण पश्चिम पाकिस्तानकडून सतत चालू आहे आणि त्यातून उद्‌भवणारा वंशक्षय टळावा म्हणून पूर्व पाकला प्रांतिक स्वायत्तता बहाल केलीच पाहिजे, ह्या त्याच्या मताचा तो व्याख्यानातून पुरस्कार करू लागला. अयूबला हा प्रचार अर्थातच मानवणारा नव्हता. म्हणून राष्ट्रीय ऐक्याला सुरूंग लावणारे भाषण केल्याच्या आरोपावरून पाकिस्तानच्या संरक्षण कायद्यान्वये २० मार्च ६६ रोजी त्याला चौथ्यावेळा जेसोर येथे अटक करण्यात आली.

त्यानंतर सुटल्यावर पुन्हा पाचव्या वेळा ६८ साली त्याला पकडण्यात आलं. ह्यावेळी मुजीबरवर जो खटला गुदरण्यात आला तो East Pakistan Agartala Conspiracy Case, 1968, (पूर्व पाक आगरतळा कट प्रकरण) म्हणून ओळखला जातो. ह्या खटल्यात त्याच्याबरोबर ३०-३५ कार्यकर्त्यांना पकडण्यात आलं. त्यातले दोघे भारतीय होते. काही आयुबच्या डोळ्यात सलणारे लष्करी अंमलदार होते. भारताबरोबर गुप्त संगनमत करून सशस्त्र बंड पुकारण्याचा राष्ट्रद्रोही प्रयत्न केल्याचा त्या सर्वांवर आरोप ठेवण्यात आला. पैकी दोघा लष्करी अंमल-दारांना तर तुरुंगातच गोळ्या घालून चौकशीविना नाहक ठार मारण्यात आलं. पाकिस्तानापासून पूर्व पाकला फोडण्याचा आपण प्रयत्न केलेला नसल्याचं ठामपणे सांगून २८ जानेवारी ६९ रोजी मुजीबूरने न्यायालयापुढे जबानी दिली. विच्यातले

ठळक मुद्दे असे आहेत :

१. पाक जनतेचा मुस्लीम लीगने विश्वासघात केल्यामुळे १९४९ साली अवामी लीगचा मांडव मी उभारला. सुऱ्हावर्दी हे आमचे नेते होते.

२. त्याच्या अगोदर, म्हणजे ब्रिटीशांच्या काळातच, पाकिस्तानची निर्मिती व्हावी म्हणून मुस्लीम लीगचा एक कार्यकर्ता म्हणून मी राजकीय कार्य केलेलं आहे.

३. १९६५ साली भारतीय आक्रमणाचा मी धिक्कार केला होता. पाकिस्तानच्या युद्धप्रयत्नांना जनतेने आणि अवामी लीगने एकमुखी पाठिंबा द्यावा म्हणून मी प्रचार केलेला आहे.

४ ताष्कंद कराराला मी पाठिंबा दिला. आंतरराष्ट्रीय प्रश्न संमजसपणे आणि सलोख्याने सोडवले जावेत असं माझं मत आहे. जागतिक शांतता आणि सहकार्य ह्यावर माझी श्रद्धा आहे.

५. बांगला देशाच्या स्वायत्ततेचा प्रश्न मी लाहोरला पक्षाच्या सभेत चर्चेला घेतला. तो पक्षाला मंजूर झाल्यानंतर मी त्याचा जाहीर प्रचार केला.

६. माझ्यावर डूख ठेवून सरकारने एक डझन आरोप ठोठावले आहेत. त्या सर्व खोडसाळ आरोपांचा मी इन्कार करतो. मोमेनखान ह्या पूर्व पाकच्या गव्हर्नराने तर असे जाहीर उद्गार काढले आहेत की, तो सत्तास्थानावर असेपर्यंत मुजीबरला तुरुंगातून बाहेर सोडणार नाही. हा शुद्ध आकस होय.

७. मी निर्दोष आहे.

ह्या आगरतळा कटाच्या केसची चौकशी डाक्क्याच्या मध्यवर्ती कारागृहात चालू होती. पावणे दोन वर्षांची सजा भोगल्यावर १७ जानेवारी ६९ रोजी मुजीबूरला डाक्का तुरुंगातून सोडण्यात आलं, पण घरी जाण्याची मोकळीक मात्र त्याला देण्यात आली नाही. तुरुंगातून रात्री सुटल्यावर तडक त्याला डाक्का कॅन्टॉन्मेंटमधल्या एका बंद खोलीत ठेवण्यात आलं. ह्या नव्या आणि कारागृहाबाहेरच्या बंदीवासात कुठलीही सबब न देता त्याला पाच महिने डांबण्यात आलं. ह्या काळात त्याच्यावर अमानुष मानसिक अत्याचार करण्यात आल्याची त्याने तक्रार केली. तुरुंगात पोलीसी क्रौर्याचे जे प्रकार झाले, त्याची प्रतिक्रिया पूर्व पाकमध्ये विद्यार्थ्यांनी उग्र आंदोलन करण्यात झाली. बंगाली विरुद्ध उर्दू असा नवा भाषिक सामना पूर्व पाकमध्ये उभा राहीला. तमाम विद्यार्थी वर्ग लढ्यासाठी उफाळल्यामुळे आयुबची पकड ढिली झाली. अनेक बंगाल्यांनी मातृभाषेच्या प्रतिष्ठेसाठी प्राण दिले. त्यामुळे पूर्व पाकची स्वायत्तता हा केवळ राजकीय सोईचा मामला उरला नाही. तो त्यांच्या जीवनमरणाचा एकमेव प्रश्न झाला. अशा परिस्थितीत काही सर्वमान्य उपाय निघू शकतो काय ते पाहाण्यासाठी आयुबने सर्व पक्षीय परिषद बोलाविली. त्या परिषदेला बोलाविलेल्या नेत्यांनी मुजीबूरला मुक्त कराल तरच आम्ही चर्चेला येतो अशी एकमुखी अट घातली. दुसऱ्या बाजूने पूर्व पाकमध्ये

असंतोष पराकोटीला पोहोचला होता व अराजकाची परिस्थिती निर्माण झाली होती. तेव्हा निरुपायास्तव आगरतळा कट खटलाच मागे घेणं आयुबला भाग पडलं. ६ मे ६९ रोजी मुजीबूरची कारावासातून मुक्तता झाली.

पुन्हा २५ मार्च ७० रोजी लाहोरला एका जाहीर भाषणात लष्करी राजवटी‑वर देशद्रोहाचा ठपका ठेवल्याच्या आरोपावरून मुजीबूरला पकडण्यात आलं. विद्यार्थी, शेतकरी आणि कामकरी ह्यांना दिलेल्या अभिवचनांना हरताळ फास‑ल्याचा त्याने सरकारवर आरोप केला. त्याची चौकशी एका खास लष्करी न्याया‑लयापुढे करण्यात येऊन ९ मे ७० रोजी मुजीबूरला सात वर्षांची सजा फर्मावण्यात आली. पण सिल्हेटच्या सेशन्स जज्जाने निर्दोष म्हणून मुजीबूरची मुक्तता केली. म्हणून त्याला पुन्हा मैमनसींगच्या सेशन्स जज्जासमोर खेचण्यात आलं. त्यानेही मुजीबरला निरपराधी म्हणून सोडलंच; शिवाय पोलीसांनी मुजीबरला नाहक छळल्याबद्दल ताषेरेही ओढले.

हे सर्व महाभारत झाल्यावर निरपराधी म्हणून मुक्त झालेल्या मुजीबूरचा पूर्व पाकच्या जनतेने उत्स्फूर्त सत्कार केला. डाक्क्याच्या इतिहासात कधी घडली नव्हती इतकी, म्हणजे दहा लक्ष लोकांची गर्दी आपल्या नेत्याला बघावयाला जमली. ह्या विजयोत्सवाच्या वेळी मुजीबूरला 'बांगलाबंधु' ही पदवी जनतेच्या वतीने बहाल करण्यात आली. १३ डिसेंबर ७० रोजी चितगाव ह्या पूर्व पाकमधल्या बंदराच्या गावी त्याची मिरवणूक काढली असताना त्याच्यावर प्राणघातक हल्ला करण्याचा निष्फळ प्रयत्न झाला. पण तो त्यातून सहिसलामत सुटला.

त्यानंतरचा इतिहास ताजा आहे. जगाच्या इतिहासात कुणाला मिळाली नाहीत इतकी, म्हणजे नव्याण्णव टक्के मते शांततेच्या आणि कायदेशीर मार्गाने त्याने


# व्होल्गा जेव्हा लाल होते

ले. : वि. स. वाळिंबे

मूल्य : अठरा रुपये

राजहंस प्रकाशन

मिळवून दाखविली आहेत. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना त्याने पुढील उत्तरे दोन महिन्यांपूर्वीच दिली आहेत–

१. सर्वांशी मैत्री आणि अजातशत्रूत्व हे आमच्या परदेशनीतीचं सूत्र असेल.

२. काश्मीरच्या प्रश्नात त्याला रस नाही.

३. अयूबला त्याने तोंडावरच सांगितलं की जर तुम्ही काश्मीरमध्ये सार्वमत मागत असाल, तर तसंच सार्वमत पूर्व पाकमध्ये मागून काय मौज होते ती पहा!

४. भारताबरोबर पूर्व पाकला व्यापाउदीम सुरू करणं भागच आहे. त्यात उभयतांचा फायदा आहे.

- ५. माझी लोकशाहीप्रणीत समाजवादावर पूर्ण श्रद्धा आहे. ब्रिटीश मजूर पक्षाने घालून दिलेल्या वस्त्याबरहुकूम लोकशाही मार्गाने समाजवाद आणला पाहिजे.

६. पश्चिम पाकिस्तानातले पंजाबी हुकूमशहा पूर्व पाकमधल्या गरीब बंगाली लोकांची क्रूर पिळवणूक सतत तेवीस वर्षं करीत आलेले आहेत. त्यांना सोईस्कर अशी राजधानी इस्लामाबादेला बांधायला ते दोनशे कोटींची दौलत उधळत आहेत आणि पूर्व पाकमध्ये सात कोटी गरीब जनता वादळाच्या आणि उपासमारीच्या वडाख्यात सापडली आहे. हा काय न्याय झाला ?

७. पूर्व पाकमध्ये पिकणारा ताग विकून पाकला ७५ टक्के परकीय चलन मिळतं आणि परकीय मदतीच्या २५ टक्के पैशांचासुद्धा विनियोग पूर्व पाकच्या विकासा-कडे केला जात नाही. हा कृतघ्नपणा आहे.

८. पश्चिम पाकची लोकसंख्या पाच कोटी आहे, तर पूर्व पाकची लोकसंख्या सात कोटी आहे. पण पाकचा सगळा खजिना पश्चिम पाकिस्तान्यांच्या सुखसोई-करच खर्च होतो.

९. परदेशी मदतीसाठी आम्ही परदेशांशी स्वतंत्रपणे खलबतं करू.

एकाच राष्ट्रातल्या दोन विभागांच्या विकासात आज हा जो असमतोल निर्माण झाला आहे, तो टळावा म्हणून मुजीबूरने सहा कलमी मागण्या पुढे केल्या आहेत. त्या अशा–

१. पाकिस्तान हे सयुक्त संघ पद्धतीचं राष्ट्र असावं. (Federal System)

२. केन्द्रीय सत्तेने फक्त संरक्षण आणि परदेशी विषयक धोरण, इतकंच पहावं.

३. दोन विभागांसाठी दोन वेगवेगळ्या नाणेपद्धती असाव्यात. (Two separate currancies) किंवा, दोन्ही विभागांसाठी दोन सयुक्त रिझर्व बँका असाव्यात. म्हणजे भांडवलाची चोरटी आदलाबदल होणार नाही.

४. दोन्ही विभागांना दोन वेगवेगळी आर्थिक धोरणं आखून त्यांची अंमलबजावणी करण्याचं स्वातंत्र्य असावं.

५. परकीय हुंडणावळीची दोन्ही विभागांची खाती वेगवेगळी व स्वतंत्र असावीत.

६. दोन्ही विभागांना वेगवेगळी सैन्यदले ठेवण्याचा अधिकार असावा.

सत्तेवर आल्यावर पुढील मार्गाने आपण क्रांती घडवून आणणार असे मुजीबूर म्हणतो :–

अ. बँका, विमा, अवजड उद्योगधंदे, परदेशी व्यापार, तागाचा आणि कापसाचा व्यापार, वहातुक आणि जलवहातूक ह्या सर्वांचे राष्ट्रीयीकरण करणार.

ब. मक्तेदारी पद्धत रद्द करणार.

क. चैनीच्या वस्तूंच्या आयातीवर सक्त बंदी घालणार.

ड. कमाल जमीन धारणेवर निर्बंध घालणार. जमीन कसणाराला अधिक फायदा करून देणार, कर आकारणी नव्या पद्धतीने करणार.

इ. भारताबरोबर भीती किंवा वैर धरणार नाही.

मुजीबर धिमा आहे. भारताबरोबर त्याचे वैर नाही. व्यापारी मैत्री त्याला हवीच आहे. मात्र भारत बांधीत असलेल्या फराक्का धरणाला त्याचा तीव्र विरोध आहे. त्याच्या मते भारताचे हे खूळ वेळीच नाहीसे केले पाहीजे, कारण फराक्का धरणा० मुळे भारताला फायदा होईल, पण पूर्व पाकचे अतोनात नुकसान होईल. तो कम्यु० निस्ट नाही. पण चीनबरोबर त्याला स्नेह टिकवायचा आहे. त्यानं म्हटलं आहे " We are a muslim nation and shall never accept communism; but friendship with China is dictated by the facts of geography and politics." म्हणजे प्रागतिक असूनही मुजीबूरमधला मुसलमान पार झोपी गेलेला नाही हे उघडच आहे !

मुजीबूरने दोन चेले तयार केले आहेत. एक आहे ऑक्सफर्ड विद्यापीठाचा डॉक्टर आणि बॅरिष्टर कमाल हुसेन. दुसऱ्याचे नांव प्रा. रेहमान सोभान असून तो ढाक्का विद्यापीठात अर्थशास्त्र शिकवितो. बौद्धिक फड जिंकण्याच्या कामी हे दोघेही मुजी- बूरला मदत करतात. लेख, व्याख्याने वगैरे बघतात. सामान्य जनतेचा लोकप्रिय नेता म्हणून स्वतः पुढे येत असतानाच बुद्धिवंतांच्या जगालाही आपणाला जिंकायचं आहे ह्याचं त्याचं भान सुटलेलं नाही. म्हणून तो बुद्धिमान चेल्यांना तयार करीत आहे. ह्याचाच अर्थ असा की मुजीबूरमधला अट्टल राजकारणी पुरुषही दैदिप्यमान यशाची धोड ऊब लागूनही गाढ झोपी गेलेला नाही !



# विलेक्षणची रोजनिशी

X X X X X X X X X X

रतनलाल भंडारी, दाभोळ

११ फेब्रुवारी ७१ : रामने अर्ज काढून घेतला नाही. केसरीत त्याचे भाष वाचले तेव्हा वाटले मुकुटराव अप्पांनी मुरूमला वहिनींच्याकडून अण्णांचा (र. के खाडिलकर) निवडणूक प्रचाराचा नारळ फोडला. काही कळत नाही. कॉंग्रेस पक्षा-तून समारंभपूर्वक बाहेर काढलेली ही मंडली अण्णांसाठी 'बिनविरोध' निवडणूक करू असा दम भरत आहेत. मला वाटतें शरद पवारांना हाताशी नसलेली संघटना काबूत ठेवण्याचा हा डाव असावा. खरेखोटे 'राम' जाणे.

१३ फेब्रुवारी : रामची आज तार आली. तावडतोब ये. मनातून जाण्याची इच्छा नव्हती. खरंच हा निवडणूक छढविणार असे दिसते. विशेषत: अण्णांचे आणि माझे जिव्हाळ्याचे संबंध. त्यांचा सहकारी म्हणून, त्यांचा चिटणीस म्हणून काही काळ काम केलेले. बंगालभर आम्ही एकत्र हिंडलेलो. कसा त्यांच्या विरुद्ध निवड-णुकीत भाग घ्यावयाचा ? परवा मंत्री झाल्यावर अण्णांना अभिनंदनाची तार करून कॉंग्रेस पक्षातुन तुम्ही पुरोगामी शक्ती मजबूत केल्यात तर आमच्यासारखं सगुण समाजवादाचे भक्त तुम्हाला दुवा देतील असे पत्रही पाठविले होते. अण्णांचे उत्तर आले. थोडे उशिरा. त्यांनी लिहिले होते, 'तुमच्यासारख्यांना ठराविक

आभाराची पत्रे न पाठविता थोडे खुलासेवार लिहिता यावे म्हणून थांबलो होतो. आता तुम्ही कोकणात आहात. खूप लिहा. निवांतपणा मिळेल. दाभोळच्या निसर्गरम्य वातावरणात तुझी प्रतिभा फुलू दे. वेळ मिळाला तर जरूर दाभोळला येईन.'

काय करू ? राम तर जिवाभावाचा मित्र. त्यातच आपण राजकारणापासून दूर पळालेलो. राजकारण आणि समाजकारण हे दोन्हीही करणे अवघड असते म्हणून तर संन्यास घेतला. पण मन ओढ घेते. संन्यास ' त्रिदंडी ' ठरावयाचा. दिल्लीची वाटचाल करणारांना गल्लीच्या दुःखांनी कणव येत नाही. आली तरी तिला सत्तेचाच एक पदर असतो. मनात नुसते काहूर माजले आहे. तात्यांची (राम काकडे) तार आल्यावर राजुल (माझी पत्नी) सारखे विचारतेय. ' काय करणार तुम्ही ?' नुसताच हसून तिच्याकडे पाहतो. तिच्या चेहऱ्यावरून कळते की इतके दिवस राजकारणापासून दूर पळणारा तिचा पती आपण अडवले तरी यावेळी नव्या वावटळीत मागे राहणार नाही. पण कुणाच्या बाजूने उडी घ्यावयाची ? एका बाजूला गुरू, एका बाजूला मित्र.

**१४ फेब्रुवारी :** शेवटी रजेचा अर्ज टाकून निघालो. मैत्री ही संबंधांपेक्षा, नात्यापेक्षा, अधिक बळकट असते हेच खरे. कऱ्हाडला मुक्काम ठोकावा लागला. इथे अजून निवडणुकीतला रंग भरलेलाच नाही. कुठेतरी मधून अधून फक्त आनंदराव चव्हाणांचे एखादे पोस्टर, फलक दिसतात. अजून निवडणुकीचा ' मद ' चढलेला दिसत नाही. दिसणारही नाही. कारण निवडणूक असली तरी इथे निवड नाहीच मुळी.

बारामतीला येऊन पोहोचलो. तात्या खरेदी-विक्रीसंघात होते. मला पाहताच त्यांचा चेहरा उजळला. कार्यालयात गेलो. जुने समाजवादी साथी भेटले. अजून कामाला वेग आला नव्हता. दिवस थोडे उरले. काँग्रेसने अण्णांच्या, इंदिरा गांधींच्या नावाचे बोर्ड सर्वत्र झळकविले होते. तात्यांचेही फलक सर्वत्र फडफडत होते. संघटना काँग्रेसच्या उमेदवारानी सर्वत्र फलकांचा पसारा मांडला होता. त्यांची (श्री. ससाणे) ससेहोलपट सुरू होती. जिल्ह्यातली आणि राज्यातील संघटना काँग्रेस त्यांना आपला उमेदवार समजत नव्हती. त्यांनी रामला पाठिंबा दिला होता. बिच्चारा !

वडगावला बाजार होता म्हणून तात्या गेला. मी मुद्दाम मागे राहिलो. नवीपत्रके काढणे आवश्यक होते. या निवडणुकीला काही ' राजकीय ' अर्थ प्राप्त करून दिला पाहिजे. नाहीतर यश येणे अवघड आहे.

उद्या यशवंतरावांची सभा आहे म्हणतात. त्यांना प्रश्न विचारणारे एक आठ प्रश्नांचे पत्रक काढले. उत्तरे द्यावीत म्हणून छत्रपतींची आण घातली. यशवंतराव, उत्तर देतील ? दखल घेतील ? कठीण आहे. पण लोकांशी, काँग्रेसवाल्यांशी, बोल-

ताना ' न द्यावयास काय झाले ? ' अशा भावनेने वावरत होतो.

दुसरे पत्रक अण्णांना मत का देऊ नये याची कारणमीमांसा करणारे होते. त्यांचा इतिहास दिला होता. त्याबरोबर ' अँन्टी कम्युनिस्ट ' भावनांना उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला होता.

दोन्ही पत्रकांत ' स्थानिक उमेदवार ' हे तत्त्व लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला होता. राष्ट्राच्या राजकारणात निव्वळ राजकीय हेतूंचा निकष नेहमीच निवडणुकीत लागतो असे नाही. पण काँग्रेसची मंडळी या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करीत होती. सगळा कारभार ' मुले घातले रडाया ' असा होता.

**१५ फेब्रुवारी :** आज यशवंतरावांची सभा. काँग्रेस पक्षाप्रमाणेच विरोधकांचे डोळेदेखील या सभेकडे लागले होते. गावात पत्रके भरपूर प्रमाणात वाटली. पत्रकातल्या टोकदार भाषेचे सर्वांनीच कौतुक केले. सभास्थानीदेखील खूप पत्रके वाटली.

पाच वाजता येणारे यशवंतराव रात्री ८–३० ला आले. त्यांचे हेलिकॉप्टर म्हणे वाट चुकले. सभेला गावोगावाहून माणसे गोळा केलेली होती. स्थानिक श्रोत्यांनी वाट पाहून घरचा रस्ता सुधारला होता. हॉटेलवाल्यांचा धंदा जोरात होता. सुप्याचे बरेच शेतकरी काँग्रेसच्या लॉरीतून आलेले होते. त्यापैकी अनेकांशी बोलण्याची संधी मिळाली. बहुतेकांचा कल रामच्या बाजूने दिसत होता. अर्थात असा ' कल दाखविणे ' मतदारांच्या आता हाडीमासी खिळू लागले आहे. प्रचारकांचा होरा ते बरोबर ओळखतात व मगच आपल्या मनातले बोलतात. छे: मनातले बोलायचे नाही असा जणू त्यांनी पणच केलेला असतो.

शेवटी एकदाचे साहेब आले. नेहमीप्रमाणे साहेबांच्या नावाच्या आरोळ्या उठल्या. ' खाडिलकर झिंदाबाद ' कुणी म्हणाले नाही. सोबत रामचे भाऊ मुगुटराव आप्पा, अकलूजचे आमदार शंकरराव मोहिते पाटील, शरद पवार असा ताफा होता. सभेला यशवंतरावांच्या नेहमीच्या सभांच्या मानाने एकतृतियांशदेखील माणसे नव्हती.

प्रारंभी मोहिते पाटलांनी मी जात न मानणारा माणूस आहे, मी 'पात' मानतो, आमची समाजवादाची पात आहे, इत्यादी खुलासा केला. अण्णा दोनच वाक्ये बोलले. ते आता खूप थकलेले दिसतात. त्यांना निवडणुकीची दगदग सहन होत नसावी. आण्णांनी थोडी विश्रांती घेतलीच पाहिजे. निवडणुकीनंतर अण्णांना पत्र लिहिलेच पाहिजे. रामच्या उमेदवारीबद्दल मोहिते पाटलांचा खुलासा ऐकून थोडी मौज वाटली. जनतेपुढे आम्ही रडतो नाही, असा ' खुलासा ' ही माणसे वारंवार करीत आहेत यातच सगळे काही आले.

साहेबांनी नेहमीप्रमाणे इंदिरा पुराण सुरू केले. अर्धवे तीस मिनिटे ते बोलत

होते. त्यांनी 'खाडिलकरांना मते द्या' असे वाक्यदेखील उच्चारले नाही. पण भाषण साफ पडले होते, हे मी विरोधकात उभा म्हणून जाणवते काय? त्यांनी तरुणांना–शरद पवारांसारख्या तरुणांना–कर्तृत्वाची संधी देण्याच्या बारामती-करांच्या वृत्तीबद्दल आभार मानले. आमची मंडळी त्यांच्या विधानाने बरीच चेकाळल्यासारखी वाटली. 'वृद्ध की तरुण' हा फालतू वाद कोण रुजवीत आहे?

रात्री कार्यकर्त्यांची सभा झाली. हरीजन कार्यकर्त्यांचा भरणा खूप होता. प्रतिष्ठित वकील, व्यापारी व विद्यार्थीही बरेच होते. आल्यापासून एक गोष्ट लक्षात आली होती. काकड्यांची निवडणूक याचा अर्थ 'चंगळ' असा करून मागील अनुभवावरून बरेचजण जमा झालेले होते. ही बाजारबुणगी फौज कमी केली पाहिजे. निदान तिला आळा घातला पाहिजे. अजून निवडणुकीतला 'आर्थिक' प्रश्न सुटलेला नव्हता. आम्ही फारच ताकदीने लढणार आहोत असा देखावा कायम ठेवला पाहिजे. एक दोन दिवसात सोय होईल असे वाटते. मी सुरुवातीलाच सर्वांना सांगून टाकले, 'ही निवडणूक काकड्यांची निवडणूक नाही हे आपणा सर्वांच्या लक्षात आले असेलच...' मंडळी कान टवकारून ऐकत होती व अविश्वासु नजरेने पाहत होती.

१६ फेब्रुवारी : अजून साधने उपलब्ध झालेली नाहीत. बाहेर प्रचारासाठी जाणाऱ्या मंडळींची समजूत घालता घालता अक्षरशः तोंडाला फेस आला. काहीतरी केले पाहिजे. इथे कुणावर विश्वास ठेवणे कठीण. पिवळा हत्ती सिगारेटच्या पाकिटाला एक रुपया दिला तर राहिलेले पैसे परत मिळवावे लागतात. पाकीट मिळते हे देखील नशिब!

रात्री मडईत शाहीर मरळीकर आणि पार्टीचा कलापथकाचा कार्यक्रम. त्यातच आमदार बी. डी. किल्लेदारांचा फोन आला. ते येत आहेत. सभा जाहीर केली. प्रचाराची साधने बारामतीत फारच महाग. नुसते अनाउंसिंग करणाराला इथे दहा रुपयें रोज.

आजच्या सभेत मी या निवडणुकीतले पहिले भाषण ठोकले. भाषणात मुद्दाम दोनतीन लोककथा सांगितल्या. यशवंतरावांनी सवालांचे जबाब का दिले नाहीत याची उलटतपासणी केली. लोकांना भाषण आवडले असे कार्यकर्ते सांगत. बहुतेक बोलणाऱ्या वक्त्याला 'भाषण आवडले' असे सांगणारी मंडळी निवडणुकीत फार असतात.

किल्लेदारांनी आपण उमेदवारी मागे घेऊन रामला पाठिंबा का दिला याचे विवेचन केले. नंतर त्यांनी कॉंग्रेस पक्षाच्या अर्थकारणावर हल्ला चढविला. दीड तास ते बोलत होते. भाईची नेहमीची भाषणातली 'एक्सप्रेस' आता बरीच कमी झाली होती. पाच सहा हजार माणसे जमली होती. त्यातली कलापथकाला किती?

आणखी एक उद्योग झाला. खोब्रागडे गटाचे पाठींबा देणारे वक्ते म्हणाले, 'जनसंघाला धर्ममार्तंडांचे राज्य आणावयाचे आहे.' जनसंघाची मंडळी रूसली. खुलासा करा म्हटले तरी 'गुस्सा' जाईना. हा सर्वपक्षिय पाठींब्यांचा तारेवरचा नाच भलताच नाजुक आहे. बिचाऱ्या वक्त्यांनी शेवटी 'क्षमस्व' म्हटले. जनसंघाचे कार्यकर्ते म्हणतात, 'आम्हाला स्वतंत्र प्रचार यंत्रणा पाहिजे.' काही झाले तरी यावेळेस अशा सुभेदाऱ्या उभारू द्यावयाच्या नाहीत. त्यांची कशीबशी समजूत काढली. रात्रीं तीन वाजता मी नी राम जेवलो. तिथेच सतरंजीवर आडवा झालो.

१७ फेब्रुवारी : आज सुप्याला सभा. कलापथकांचा कार्यक्रम. बाजारचा दिवस. प्रचारांसाठी ट्रकभर तरी 'मते द्या' म्हणणारी मडळी पाठविली पाहिजेत. पण वाहने अजून आली नाहीत. मोठ्या मुष्किलीने पाच वाजेपर्यंत पोहोचलो. राम इंदापूरहून सभेसाठी आला होता. विजय आणि गणपतराव आवटेही आले होते. बाजार विस्कटला होता. सभेला चार-पाचशे मंडळी पांगून बसली होती. सभेत वक्त्यांची गर्दी होती. मी आवरते घेतले. अंधार पडला तरी सभा संपेना. घरी जाऊन आलो. डॉक्टर, आणि सगळे भेटले. मी या निवडणुकीत उतरलो हे घरच्या कोणालाच पसंत नव्हते. पण कुणी बोलत नव्हते. डॉक्टरांनी एकच प्रश्न विचारला 'राम एस्. एस्. पीत होता ना? मग आता अपक्ष उमेदवार का?' उत्तर सुचले नाही. पण 'स्टॅटेजी' आहे असे सांगून वेळ मारून नेली. तात्या घरी आला. आईच्या पाया पडला. आई क्षणभर भारावून त्याच्याकडे पहात राहिली. तोंडभर आशिर्वाद दिला. रामला आता तंत्र जमू लागले आहे. सुप्यात वातावरण रामच्या बाजूचे आहे. तीन हजार मतदान झाले तर दोन हजारपर्यंत मते मिळविल. पण आता नव्या नियमाप्रमाणे गाववार मतदानाचे आकडे कळतात कुठे? एका दृष्टीने अनेकांची या नियमाने सोय झाली आहे. विशेषतः कार्यकर्त्यांची.

१८ फेब्रुवारी : आज वहाने उपलब्ध झाली. फारच थोडी. पण त्यांच्या साह्याने सर्वत्र प्रचाराचा धुदारोळ उडवून दिला. इतर पक्षांची वहाने फिरतच होती. ससाणेंचा लाउडस्पिकर निजलिंगप्पांची सभा २४ फेब्रु. ७१ बारामतीत होणार आहे असे सांगत होता. आम्ही लोकांना सांगायचो. 'थाप आहे. संघटना कॉंग्रेसचा पाठिंबा रामलाच आहे.' सालं, हे संघटना कॉंग्रेसचं कोडं भलतंच गुतागुंतीचे दिसतंय. "ट्रक येतो. सभेला बाजार असल्यामुळे अनेकांच्या भेटी झाल्या. एक पंचायत समितीचे सदस्य म्हणाले, माणसे पाठवा म्हटले की, माणसे भरून देतो. त्यांनाही आता मागून 'मते द्या' म्हणून ओरडावयांचे माहीत झाले आहे. आमदार येतात 'राज्याचा बंदोबस्त कसा?' म्हणून विचारले तर आबादी आबाद हे उत्तर ठरलेले. तुम्ही निश्चींत रहा. गमत आहे की नाही? आज सगळ्या तालुक्यांचा रिपोर्ट

मिळाला. शिरूर, दौंड, बारामतीत रामची पोझिशन साउंड दिसते. इंदापूर, करमाळा कठीण. माळशिरस म्हणजे ऐनवेळी परमेश्वरावर हवाला. तेरी भी चूप और मेरी भी चूप. रामचे सगळेच नातेवाईक.

१९ फेब्रुवारी : आता साधने मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होऊ लागली आहेत. बाजारपेठेत ऑफीस उघडले. 'प्रेस'ला क्षणाची उसंत नव्हती. निरनिराळी पत्रके निघत होती. आणि त्यांतली नव्वद टक्के पत्रके मी लिहित होतो. प्रत्येक पत्रकाखाली नवी घोषणा लिहित होतो. जिथे जिथे गळेल घाम, तिथे तिथे ठाकेल राम. इंडीकेट, इंडीकेट राम आपचा कँडीकेट. आदेश आहे बावाचा, तराजू उचला रामाचा. कितीतरी आकर्षक घोषणा. 'सहकार'ला प्रेसचे काम उरकत नव्हते. 'आशिष' मध्येही छपाई सुरू केली. शहरातही कार्यकर्त्यांनी पदयात्रा सुरू केल्या.

रात्री पुन्हा एकदा सुप्याच्या बंदोबस्ताला निघालो. मुद्दाम काँग्रेसला अनुकूल असलेल्या वाडीत बैठक मारली. मी प्रथम राजकिय पुराण सांगितले. मग चर्चा रंगायला सुरुवात झाली. शेवटी मंडळींचे एकमत झाले राम 'आपला' आहे ना? मग त्यालाच मते देऊ. आम्ही हरीजनांना निवडून दिले मग मराठ्यांनीच काय पाप केलय ही भावठी मात्रा लागू पडल्यासारखी दिसली. तिथे एकाने गोष्ट सांगितली, "एका सापावर एका शेतकऱ्याचा चुकून कुऱ्हाडीचा घाव पडला. तो साप झाला लांडा. सगळे त्याला 'लांडा साप' म्हणत. तो सूड घईल म्हणून शेतकऱ्याने शेतात जाण्याचे सोडले. मुले शेतीसाठी शेतात जात. एक दिवस तो मुलांना दिसला. मुलांनी घरी येऊन म्हाताऱ्याला 'आपला लांडा साप' दिसला म्हणून सांगितले. त्याच्या पोटात धस्स झाले. पुढे हा साप गुरांबरोबर घरापर्यंत येऊ लागला. मुले सांगत, 'आपला लांडा साप' आज घरापर्यंत आला. म्हातारा प्रत्येक बातमीने खचत होता. शेवटी जेव्हा साप त्याला चावण्यासाठी आला तेव्हा त्याने 'आपला लांडा साप' हे शब्द ऐकले व 'आपला' म्हटल्याचे ऐकून वैर सोडून दिले.

त्यामुळे निवडणुकीत या 'आपला' शब्दाला फारच शक्ती प्राप्त होत असावी. जातीयवाद एका बाजूनेच होता. असे नव्हे. मागे केलेली जातीयवादी प्रचाराची पापे काँग्रेसच्या पुढ्यात राक्षसारखी उभी रहात होती. अल्पसंख्यांकांच्या, विशेषत: मुसलमान समाजाच्या बैठकीतून विरुद्ध अर्थाने काँग्रेसची मंडळी हाच जातीयवादी प्रचार करीत होती. एकूण काय तर ज्यामुळे झोळीत चार मते अधिक पडतील ते ते सारे ग्राह्य असते.

रात्री १ ला ही बैठक विसकटली. दोन वाजता राजबागेत जाऊन कुळाला उठविण्याचा प्रयत्न केला. रानांत सैरभैर पसरलेल्या बाटकांच्या आक्रोशाला माणसे आडवी झाली होती. शेवटी कसे तरी कुळाला उठविले. दाट काळोखात देखील

दुष्काळाने केलेले त्यांचे हाल शरीराला इंगळया डसाव्यात तसे डसत होते.

रात्री तीन वाजता सुपयाला आलो. घरी जावयास वेळ मिळाला नाही. उद्या आईला कळल्यावर खूप रागावेल. तशीच बारामतीच्या दिशेने जीप हाकारली गार वारा अंगाला झोंबत होता. नव्या जीपचे पडदे बांधता येत नव्हते.

२० फेब्रुवारी : आज कामाला व्यवस्थित प्रारंभ झाला आहे. डॉक्टर, वकील अनेकजण सामान्य कार्यकर्त्यांबरोबर दूर दूर आपल्या प्रभावक्षेत्रात जातीने प्रचार करीत आहेत. इलेक्शनला रंग चढू लागला आहे. राम, किल्लेदारांच्या बरोबर दौऱ्यावर आहे. थोडीशी उसंत मिळाली आहे.

आज काँग्रेस पक्षाने अचानक ट्रकची मिरवणूक काढली. मंडळी वाणेवाडीला वसंतराव नाईकांच्या सभेसाठी गोळा केलेली होती. तीच मॉब रात्री बारामतीच्या यशवंतराव मोहित्यांच्या सभेसाठी वापरावयाचा होता.


बारामतीच्या बाजार पेठेतून सत्तेच्या मदाने धुंद झालेला काँग्रेसी हत्ती मिरवत निघाला मोता. विशेषतः रामच्या पाठीशी उभ्या असलेल्या बारामतीतील व्यापारी वर्गावर दहशत निर्माण करण्याचा त्यांचा हेतू स्पष्ट होता. गांधी चौकात निर्विकार मनाने मोही ८।१० ट्रकची मिरवणूक पहात होतो. तेवढयात झेंडयाच्या काठीने एका ट्रकमधील जमावाने रामचा वद्धाबरोबर की तरुणांबरोबर हा प्रचार फलक खाली पाडला. मला तो बोर्ड आवडत नव्हता. पण त्यांच्या या कृत्याने कुठेतरी खोलवर जखम झाली होती. आमचे बहुतेक सर्व कार्यकर्ते बाहेरगाव गेले होते. जंबुकुमार ढाकालकरांच्या दुकानात (टेंपररी कार्यालय) गेलो. जंबु इन्स्पेक्टरला झालेल्या प्रकाराची माहिती फोनवर सांगत होता. मधूनच इन्स्पेक्टरलाच 'एक बोर्ड बारामतीत ठिकाणावर रहाणार नाही' म्हणून दम देत होता. मी त्याला 'गंभीर परिणाम होतील' असे म्हणावयाची सूचना दिली. पण जंबूच्या डोक्यात राख कालविण्याचा झटपट परिणाम झाला. इन्स्पेक्टरने हा मिरवणूकीचा हत्ती रोखून धरला व प्रकरण मिटल्याशिवाय मिरवणूक पुढे जाऊ देण्यास नकार दिला. त्यातच काँग्रेसने विगर परवाना मिरवणूक काढलेली. शेवटी बरीच वादावादी होऊन काँग्रेसने 'दिलगिरी प्रदर्शित करावी' असा तोडगा निघाला. काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तसे कबूल करून निघून गेले. पुन्हा मिरवणूक सुरू झाली. पण दिलगिरी प्रदर्शित करण्याचे नाव नाही. बहुतेक सत्ताधाऱ्यांनी अशी माफी मागणे अपमानस्पद आहे. अशी संथा त्यांना वरिष्ठांकडून मिळाली असावी. 'संध्याकाळी बघू' असे म्हणत हा मिरवणूचा रथ पुढे सुरू झाला. काय करावे कुणालाच कळेना. कार्यालयासमोरून फलक पाडणारा ट्रक जात होता. माझ्या अंगात कोठून बळ आले कोणास ठाऊक? मी भररस्त्यात त्या ट्रकला अडवून उभा राहिलो व काँग्रेस पक्षाने कबूल केल्याप्रमाणे दिलगिरी प्रदर्शित केल्याशिवाय हटणार नाही अशी

घोषणा केली. पुन्हा तो सत्तेच्या मदाने झुलणारा हत्ती थांबला. पण आता त्याच्यातला जोश ओसरला होता. शेवटी बरीच वादावादी होऊन अध्यक्षांनी दिलगिरी प्रदर्शित केली. बोर्ड लावून देण्याचे कबूल केले तेव्हा मिरवणूक पुढे गेली. त्याच्या मिरवणुकीच्या निमित्ताने लोकमत आमच्या बाजूला वळविण्यात आम्हाला यश मिळाले होते. माझ्यासारख्याला सामान्य माणसातल्या प्रचंड शक्तीचीही ओळख झाली. गांधीजी याला सत्याग्रह म्हणत ना? या फलकांच गुऱ्हाळ पुढे दोन तीन दिवस चालू होते. पण कॉंग्रेसवाल्यांनी तो फलक पुढे लावला नाही. मला तो आवडला नव्हताच. आचारसंहितेचा विचार करण्यासाठी कॉंग्रेसने पाठविलेल्या नियम कार्यकर्त्यांनेही असे आश्वासन दिले होते. पण आचारसंहिता ही नेहमीच इतरांना सांगण्यासाठी असते पण कॉंग्रेसची मंडळी चिडली आहेत. आपणाला माफी मागावी लागू नये म्हणून काळजी घेतली पाहिजे.

रात्री कार्यकर्त्यांची बैठक झाली. मी हेमंत कुमार बसूंच्या खूनाबद्दल ठराव मांडला. ठराव पास होऊन दुखवटा व्यक्त करण्यात आला. पण सर्वांच्या चेहऱ्यावर हा कोण 'बसू?' असा भाव होता. उद्याच्या वृत्तपत्रापर्यंत त्यांना थांबू देणंच इष्ट.

२१ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी : आता निवडणूक सर्वांच्याच अंगात भिनू


# थोडे थोडे साठविता धन पुष्कळ होते गाठी
# महाराष्ट्र बँकेची
# कूपन डिपॉझिट योजना



तुम्हाला खर्च करता करता बचत
कशी करावयाची त्याची युक्ति सांगेल

आपण माल खरेदी केल्यावर पैसे देता...दुकानदार योग्य ती किंमत घेऊन उरलेले सुटे पैसे परत देतो...ही किरकोळ मोड परत घेण्याऐवजी महाराष्ट्र बँकेची कूपन्स मागा...ती ५० पैशाची किंवा एक रुपयाची असतात...
तुम्हाला जी कूपन्स डिपॉझीट पत्रिका देण्यात येईल तीवर ही कूपन्स चिकटवा.

कूपन्सची एकुण किंमत रु. ५०/- झाली की, निश्चित मुदतीच्या ठेवीमध्ये त्याचे रूपांतर करा — तुमच्या नकळत अगदी सोप्या पद्धतीने विशेष प्रयत्न न करता तुमची बचत होऊ शकेल. बचत करा व निश्चित मुदतीच्या ठेवीच्या योजनेचा पूर्ण लाभ घ्या ..

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफीस: ११७७ बुधवार पेठ, पुणे-२

ही योजना पुणे शहरापुरतीच मर्यादीत आहे

6932-B

लागली आहे. रामच्या बाजूने मोटार सायकलच्या फेऱ्या, ट्रक्सची प्रचंड मिरवणूक, (एकंदर २१) पदयात्रा यांचा जोर वाढला आहे. अनेक कुंपणावरचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत. रोज एक दोन सभामधून भाषणे ठोकतो आहे. सभातून ' माणूस 'मध्ये प्रसिद्ध झालेल्या माझ्या जाहीर नाम्याच्या आधारे विवेचन करतो आहे. अनेक लोककथा, कोटया, बोचकारे ओघवत्या भाषेत सांगतो आहे. राम ' अपक्ष ' उमेदवार असल्यामुळे त्याची बांधीलकी जनतेशी आहे. कुठल्याही पक्षाशी नाही हे तावातावाने सांगतो. बहुतेकांना हे आवडते. विशेषतः जनतेला. पण सर्व-पक्षीय कार्यकर्ते थोडे नाराज राहतात. नाईलाज आहे.

दुसरी एक गंमत. आमच्याकडे वक्त्यांच्या अभाव. त्यामुळे थोडे इंम्प्रेसिव्ह वाटावे म्हणून माझ्या सायीदारांनी मला ' कोकण केसरी ॲड. रतनलाल भंडारी ' असे नाव दिले आहे. निवडणूकांच्या गोंधळात वक्त्यांच्या खऱ्याखोटया उपाधीकडे कुणी पहात नाही. त्यात आमच्या प्रचारात बहुतेक वकीलमंडळी असल्यामुळे ॲड-व्होकेट असणे सारेच स्वाभाविक समजतात.

परवा बारामतीत अण्णांच्या हस्ते बँकेच्या शाखेचे राजेशाही उद्घाटन झाले. जाहीरपणे मतदारांना इंजिनाची लाच देण्यात आली. विशेष म्हणजे तर्कतिर्थी-सारख्यानेही त्यांचे ' मंत्री कामाला लागले ' म्हणून लटके समर्थन करण्याचा प्रयत्न केला तेव्हा मला खूप आश्चर्य वाटले. उद्घाटनाच्या सभेत प्रथमच माझी आणि अण्णांची नजरानजर झाली. ठसठसणाऱ्या जखमेवर कोणीतरी टाचणी टोचावी अशी माझी अवस्था झाली. त्यांचे ओठ आणि डोळे मला बोलावीत आहेत असे वाटले. पण माझ्या पायातले वारेच गेले होते. कशाला आण्णांना भेटावयाचे ? हा मानभावोपणा मला जमला नसता. कदाचित मी रडलो असतो. अण्णा, माफ करा. कधीकधी आपण आपल्या अंगावर अशा झुली चढवतो की, त्या उतरवता येत नाहीत. अण्णा, तुमच्या भोवती जमलेले हे बाजारबुणगे केव्हा तुम्हाला दगा देतील हे ठावूक नाही.

सुप्याला पुन्हा सभा झाली. तर्कतीर्थांची सभा. कॉंग्रेसने घेतली. नंतर आमची. सभेतच ऑलवूड आणि नेते भेटले. दोघही या भागात संशोधन करीत आहेत आमच्या सभेत जनसंघाचे एक कार्यकर्ते ' रशियात एकवीस रुपये किलो मटन ' आहे म्हणून सांगत होते. ऑलवूड म्हणाला, ' What is in that. In U. S. A. it is 25 Rs. kilo. '

चावीस तारखेला रात्री बारामतीत तिन्ही पक्षाच्या सभा होत्या. आमच्या बाजूने वि. रा. पाटील, कॉंग्रेसचे तर्कतीर्थ आणि संघटना कॉंग्रेसचे निजलिंगप्पा. त्यात निजलिंगप्पा आलेच नाहीत. संघटना कॉंग्रेसची बलेडी सुरूच आहेत. तर्क-तीर्थांच्या सभेला हजारभर माणसे. आमदार वि. रा. पाटलांच्या सभेला सात आठ हजार.

विराचे भाषण जोरकस झाले. लोकांना फार आवडले म्हणे. मी आणि विजय स्टेजवर बसलो होतो. पाटलांनी मध्ये फारच अर्वाच्यपणा केला. मी आणि विजय ताड्कन व्यासपीठावरून उठून खाली आलो. विजय म्हणाला, 'सिगारेट ओढ. लोकांचा आपण निषेधार्थ उठलो असा समज होईल' मी होऊ देत म्हणालो. पण एक सिगारेट ओढली. व सभा सोडून मोकळ्या हवेत आलो. आमचे चेहरे मातिकाळा जाऊन आल्यासारखे झाले होते. एवढ्यात राम बाहेरगावाहून आला. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. कुणीतरी आम्हाला धरून नेल्यासारखे व्यास-पीठावर नेऊन बसविले. आमच्या माना सभा संपेपर्यंत वर झाल्या नाहीत.

२५ तारखेला रामची प्रचंड मिरवणूक बारामतीत निघाली. बेहोष, धुंद आणि निश्चयाने पावले टाकणारा तो एक प्रचंड जनसमुदाय होता. मीही खूप घोषणा दिल्या. आवाज बसत चालला होता. कॉलेजातली तरुण मुलेदेखील बेहोषपणे 'हटाव, हटाव, खाडिलकर हटाव' अशा घोषणा देत होती. मिरवणुकीवरूनच विचार करायचा म्हटलं तर रामचा विजय निश्चित होता.

२६ तारखेला रात्री निजलिंगप्पांची जाहीरसभा. तेही वेळाने आले. संघटना कॉंग्रेसच्या जिल्हा शाखेने सांगितले होते, अध्यक्षांचा अपमान करू नका फक्त जाणीव द्या. म्हणून कॉलेजच्या मुलांना We want Kakade अशी घोषणा शेवटी देण्यास सांगितले. आप्पांचे भाषण अतिशय चांगले झाले. मुद्देसूद, स्पष्ट आणि आक्रमक त्यांनीही खाडिलकरांचा रशियन एजंट असा उल्लेख केलाच. सभा संपली आणि एकच घोष उठला, 'We want Kakade' हे संघटना कॉंग्रेसचे भिजत घोंगडे शेवटपर्यंत भिजतच होते.

२७ फेब्रुवारी : आजपासून प्रचार बंद. रामने सकाळीं पदयात्रा केली. त्याचे उत्स्फूर्त स्वागत झाले. दुपारी ५ वाजेपर्यंत ट्रकमधून अभिनव पद्धतीने ठिकठिकाणी व्यापाऱ्यांनी, डॉक्टरांनी, कार्यकर्त्यांनी रामच्या पाठिंब्याची भाषणे केली.

आता झिरो अवर जवळ येत चालला. कुठे एजंट नाहीत, कुठे काय केले पाहिजे, याचा आढावा घेतला. जितके शक्य होते ते सर्व केले. रात्री १ वाजता भैय्या-साहेबांना आणायला टेंभुर्णीला रामबरोबर गेलो.

२८ फेब्रुवारी : टेंभुर्णीला वेळेवर भैय्यासाहेब आंबेडकर येऊ शकले नाहीत म्हणून इंदापूरला येऊन थांबलो. रामने बाजारपेठेत पदयात्रा केली. आम्ही इतरांची नजर चुकवून पोटात थोडीशी मिसळ ढकलली. दहा साडेदहाच्या सुमारास भैय्या-साहेब आले. अगदीच साधा आणि सीधा माणूस. वाड्यात गेल्यावर कोरभर भाकर आणि चटणी खाल्ली. इंदापूरला पाच पाच फुटावर खाडिलकरांचे बोर्ड होते. मधून मधून चार पाच बोर्ड रामचेही होते. ससाणेंचे पोस्टर कुठेच नव्हते.

मंत्र्यांचा तालुका आणि मंत्र्यांची कर्मभूमी. पण इथे बहुतेक समाज जनसंघाच्या व पी. एस्. पी च्या मागे दिसत होता.

मंत्र्यांच्या गावी बावड्याला गेलो. रामराव काकडे आले आहेत म्हणताच अनेक नजरा डोकावून पहात होत्या. सिंहाच्या गुहेत प्रवेश करावा तसे वाटत होते. तेवढ्यात शाहूराव पाटील हे मंत्र्यांचे बंधू भेटले. त्यांनी कॉंग्रेसच्या कार्यालयात चहा पाजला. रामने 'हे उद्या एजंट म्हणून येतील' असेही सांगितले. जेवण्या-खाण्याची व्यवस्था करतो असेही शाहूरावांनी आश्वासन दिले. पेढ्यातून रामराम करीत आम्ही बाहेर पडलो.

भैय्यासाहेब वाड्यात होते. त्यांनी हात जोडून विनंती केली. बावड्यांचे गावकरी पाठीवर होतेच.

अकलूज...या निवडणुकीतील सर्वांत रहस्यमय शहर. गावात कुठेच कुणाचे बोर्ड फारसे दिसत नव्हते. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसारखे खाडिलकरांचे बोर्ड कुठेतरी फडफडत होते. वहिनींनी (सौ. कमल बाबूलाल काकडे) घरोघर रामचा प्रचार केलेला होता. खाडिलकरांच्या बाजूला होते स्वत: आमदार. वहिनींचे भाऊ. बहिणीने रामच्या प्रचाराचे कंकण बांधलेले. पण कुठेही वातावरणात कडवटपणा नव्हता. अकलूजला घरोघर आम्ही पदयात्रा केली. रस्त्यावर अनेक टोळकी जणू रामराव काकडेंना पहात होती. प्रतिष्ठित चहापानाचा आग्रह करीत होते. अकलूज-मध्ये प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक खेळकर हसू होते. येथून पुढे भैय्यासाहेबांचा आणि आमचा संबंध तुटला. त्यांनी बारामती, दौंड गाठले. आम्ही मात्र अकलूजला अडकून पडलो.

आमदारांच्या आलिशान बंगलीवर गेलो. एका सुंदर बागेत आमदारांचे निवास-स्थान होते. एक भव्य कारंजे सर्वांचे स्वागत करीत होते. राम जाऊन वहिनींचे (सौ. मोहिते पाटील) आशीर्वाद घेऊन आला. आम्हालाही सरबत घेण्यासाठी बंगलीत जावे लागले. राम सांगत होता. त्या म्हणाल्या, 'त्याचं मला काही ठाऊक नाही. पण पाहुणं, माझं मत तुम्हालाच मिळेल.'

ग्रामपंचायतीच्या ऑफिससमोर आमदार आणि इतर मंडळी बसली होती. राम एकटाच त्यांना भेटला. दोन मिनिटात त्याने आशिर्वाद मागितला. आमदार म्हणाले 'बिनधोक जा.'

रात्री ९ वाजता नातेपुते, वालचंदनगर करून बारामती गाठली. वालचंदनगरला हॉटेलमध्ये पुन्हा एकदा मिसळ ढकलली. रात्रीचे आठ वाजले होते. वालचंदनगर ते बारामती या दिव्या रस्त्यावरून येताना जवळजवळ तास दिड तास गेला. भैय्या-साहेब आपली कामगीरी करून पुढे गेले होते.

आज कत्तलची रात्र. जेवढे करावे तेवढे थोडे. वृत्तपत्राला ट्रंक लाऊन बातम्या दिल्या.

१ मार्च ७१ : बाबा (रामचे भाऊ) मलतेच उखडले. त्यांच्या आदेशाप्रमाणे सुपे गांठले. मतदान व्यवस्थित सुरू होते. काही ठिकाणी कॉंग्रेसची मंडळी पाठीवर होती. रामला या भागात अपेक्षेप्रमाणे मतदान होते आहे. गाडी सुप्याच्या कार्यकर्त्यांच्या ताब्यात देऊन घरी अंघोळ केली. पोटभर जेवलो. कॉंग्रेस पक्षाच्या मंडळींशी गप्पा ठोकल्या. दहा पाच मतदान केंद्र उरकून बारामतीला आलो. बावडयांचे काय झाले असेल ?

बारामतीत येऊन पोहोचलो तो तोच विजयला बावड्याला शाहूराव पाटलांनी मारहाण केल्याचे वृत्त कळले. तो निवडणूक एजंट होता. पुन्हा सर्वत्र गंभीर वातावरण निर्माण झाले. त्याला डोळयांनी पाहीपर्यंत जीवात जीव नव्हता. शाहूराव पाटलांनी त्याला डोक्यांत घालावयास तोड उचलली होती. कशी ही लोकशाही ? आधीच्या दिवसापर्यंत लोकशाहीचे महन्मंगल स्तोत्र म्हणावयाचे आणि मग ठोकशाही. त्याला बराच मुका मार लागला होता. चप्पलांच्या माराने अंग सुजले होते. डोक्याला, दोन तीन ठिकाणी जखमा झाल्या होत्या.

सर्व वृत्तपत्रांना फोन लाऊन बातमी दिली. या सर्व प्रसंगात राम एखाद्या वाघासारखा वागला होता. त्याचा उल्लेख टाळला. केसरी विरोधी वृत्तपत्र. बातमी दिली नाही.

सगळीकडून बातम्या येत आहेत. काही आम्हाला उल्हासीत करणाऱ्या. काही नाराज करणाऱ्या. करमाळा तालुक्याचे वृत्त फारसे बरे नव्हते. तरी सुद्धा वाघासारखी एका प्रचंड सत्तेशी आम्ही झुंज घेतली.

२ मार्च : दिवसभर मतदानाच्या उलट सुलट बातम्या येत होत्या. पण आता त्यात रस नव्हता. विजयच्या मारहाणीच्या निषेधाची प्रचंड जाहीर सभा भरली. दहा बारा हजार लोक उत्स्फूर्तपणे जमले. अनेकांनी निषेध केला. आमचे मित्र भाई रणसिंग यांनी कॉंग्रेसपक्षातर्फे निषेध करण्याचा प्रयत्न केला. पण लोकांनी त्यांना बोलू दिले नाही. त्या गोंधळातच मी बोलायला उभा राहिलो. फारच तळमळीने बोललो. आमचे भांडण वाणी आणि कृती यामधल्या जमिन अस्मानाच्या अंतराबद्दल आहे हे निक्षून सांगितले. सभा संपल्यावर माणिकलाल शहासारख्या मातब्बरान पाठ थोपटली.

सर्वांना काहीतरी कारणे सांगून रात्री साडेबाराला बारामतीला रामराम केला. सोबत राम काकडे, विजय, जंबू हे मित्र होते. एक दिवसांच्या विश्रांतीसाठी ही मंडळी दाभोळला निघाली होती. निवडणूकीचा कोलाहाल संपला होता. दूर किनारपट्टीवर दाभोळला माडोच्या कुशीत झोपलेले माझे घर डोळयांपुढून हालत नव्हते.

□ □ □



# दृष्टांत

आज परत तेच. तीव्र आवाज. तसेच खळकन् गळलेले अश्रू. का? कोण लागलं आहे माझ्या मागे? मला तर आठवत नाही मी कुणाचं वाईट केल्याचं. कोण हे? कशाकरता वारंवार हा दृष्टांत?

ना भाऊ, ना बहीण. ना आई, ना वडील. माझे नक्की वडील कोण? अक्करमासा मी. हो, लाज का वाटावी? जे आहे ते सूर्यप्रकाशाइतके सत्य अन स्वच्छ.

आज मी एवढ्या उच्च प्रतिष्ठित स्थानावर नेमला गेलोय. फक्त दैवानं एवढीच

---

उषा कुलकर्णी

---

साथ दिली...कुणी तरी दाता भेटला. शिकवत राहिला..अन् मी भराभर शिकत गेलो.

शाळेत मुलं चिडवायची...' बिन बापाचा,' अन् कुठेतरी जोरदार कळ उठायची. अंगभर भिनायची. प्रत्येक विषयात येणारा पहिला नंबर, नि त्यामुळे झालेली वारेमाप स्तुती. सार विसरायला व्हायचं.

ज्याच्या उदार अंतःकरणामुळं मी शिकत गेलो, ज्या दात्यानं मला वडिलांची आठवण होऊ दिली नाही...घरातलाच एक असा वाढवला...त्यांच्याचबद्दल तर होत नसेल ना हा दृष्टांत ?

पण त्यांच्याबद्दल दृष्टांत का व्हावा ? त्यांचं स्वतःचं केवढं ऐश्वर्य. बायको अन् चार मुलं...असा मनुष्य माझ्या स्वप्नात वेळी अवेळी येण्याचं कारण ?

मी कोण त्यांचा ? केवळ भूतदयेनं वाढलेला मी पण मग ते अधूनमधून, अगदी पहाटेच्या वेळेस दिसणारं ते दृश्य ?

म्हणतात, पहाटेची दिसलेली दृश्यं खरी ठरतात. पहाटेसारखी मंगल वेळ नाही. ऋषिमुनींनी जिची वर्णनं पानंच्या पानं लिहून काढली ती पहाट...मग अशा वेळेस झालेला दृष्टांत अमंगल कसा असू शकेल ?

काहीतरी खासच त्या मागें आहे. नामांकीत संस्थेत उच्च पदावर नेमणूक झालो, अन लगोलग त्याच पहाटे झालेला तो दृष्टांत. भर म्हणून की काय, आजपर्यंत कधीही न दिसलेला उजवा हात अन तोही फक्त मनगटापासून पुढचा.

सारा दिवस कशी आतून अनामिक हुरहूर लागलेली असते. कुठेतरी, काहीतरी जिवाभावाचं हरवलंय, निकट सान्निध्यात असूनही ते दिसत नाही. सापडत नाही, अशी काहीशी अवस्था होते. कशात लक्षच म्हणून लागत नाही.

कुणाला सांगावी ही व्यथा ? बायकोला...? मूर्खात काढेल ती मला...फुरसत कुठे आहे तिला माझी व्यथा ऐकायला...? निवांतपणे जर बसू म्हटलं तर शक्य तरी आहे का ? अन् एक वेळ शक्य झालं तर...सांगावं का तिला ? नको... नकोच.

–अन् कदाचित भावनेच्या आहारी जाऊन किंवा मनात सदैव सलणारं एक शल्य कायमच काढून टाकू, या विचारान तिला सांगितलं तर..., तर ती ऐकून जरूर घेईल...अन् पटकन् म्हणेल ' एवढे अंधश्रद्धाळू असाल अशी कल्पना नव्हती मला,' आणि मग तो विषय तेवढ्यावरच सोडावा लागेल...

–नको...जे अनेक वर्षांपासून एकट्या मनानं जपलंय, जोपासलंय...ते...ते एकट्यातच...माझ्यातच राहू देणार मी. माझ्यातच राहू देणार. अशीच वाट पाहणार...त्या दृश्याबरोबर कधी न दिसलेला हात परवा पहाटें दिसला...

कुणाचा असावा ? अद्यापही तो नजरेसमोर तरळून जातो पण बुद्धीला आकलन होत नाही...कुणाचा असावा तो ?

अचानक आकलन होईल का कधी? की सतत, हे असंच चालू राहणार? स्वप्नातच सर्व खुलासा होईल की...कीं कुणी माझ्या माहितीत नसलेला, पण त्याला मी पूर्ण परिचयाचा आहे असा कुणी भेटेल अन् क्षणात सर्व खुलासा होईल?

मती कुंठीत होते विचार करकरून. जिथे, ज्यात हात घालावा, तिथे मग तो प्रश्न कितीही जटील असो, कितीही किचकट असो, यश हमखास आहेच. सदैव हात जोडून नम्रतेनं उभं राहून ताटकळत राहिल्यागत...

मग या दृष्टांताबद्दलच अपयश का? कसले आंतरिक धागेदोरे गुंतले आहेत त्यात?

पाठपुरावा नाही, कोणतेही अकल्याण नाही...पण मग ते अश्रू? जाणवतात ते फक्त डोळ्यातून निखळलेले अश्रू. डोळे नाही. आवाज येतो, पण तो फक्त आवाजच. तिथे दिसत कुणीच नाही.

–की हा सारा मनाचा खेळ? मनात कसलंही असमाधान नाही. जी जी म्हणून इच्छा असते, ती ती सर्व पूर्ण झालेली. कुणाशीही हेवेदावे नाहीत. शत्रुत्व नाही. दानासाठी हात कधीच आखडलेला नाही आणि तरीसुद्धा.

ती आंतरिक तळमळ, तो दृष्टांत होताच वाटणारी हुरहूर...कुठे, कशात चुकतंय...? नाही. नाहीच बोध होत त्याचा.

कधी कधी तर तळपळ फार वाढते. मनात मावेनाशी होते. मनाच्या डोहातून सारखं काहीतरी प्रतिध्वनित होत राहिल्याची जाणीव क्षणाक्षणाला वाढते...

आतल्या आत कुठेतरी एक कोपरा अंधःकारमय वाटतो. कधी कधी गढुळलेला. मधूनच त्यात काहीतरी डोळे दिपवणारं क्षणभरच चमकून जातं असं वाटतं...

–तर कधी नजरेला न सोसणारा प्रकाश. कसलं द्योतक समजू मी? कुणाला सांगू हे असं वाटतं म्हणून. विश्वास तरी ठेवील का कुणी माझ्या सांगण्यावर?

काठोकाठ सुखानं भरलेल्या पात्रागत. कधीही न हिंदकळणारं, तृप्तीनं भरलेलं घर, बायको, मुलंबाळं...मोठा मुलगा माझ्याच पाऊलावर पाऊल ठेवून पुढं पुढं जाणारा...कर्तृत्ववान तेवढाच शीलवान...वयात आलेला. कारणभर सरसच सर्व बाबतीत–

–अशाला सांगू का माझी व्यथा? नाही, नाही. त्रिवार नाही. मनाची तळमळ, हुरहूर त्याला सांगणं म्हणजे त्याच्या पवित्र जीवनाला अडसर बसवल्याची मला टोचणी सतत लागून राहील.

मी वडिलांना पाहिलं नाही. आईचा फक्त जन्म देण्यापुरता संबंध...त्यात आणखी कायमची समाजानं चिकटवलेली उपाधी. बिनबापाचा. म्हणून सोसावी लागलेली दुःखं...मानहानी...

–पण माझ्या मुलाच्या बाबतीत मी तशी परिस्थिती येऊच दिली नाही...

तिथेही मी दैवावर मात केली. अनोळखी ठिकाणी येऊन स्थायिक झालो... अत्यंत मानाने जगत आहे. कशातही कसली कमतरता नाही......

—आणि अशा परिस्थितीत होणारा तो दृष्टांत...काय सांगतोय...काय मागतोय तो माझ्याकड...स्पष्ट का नाही सांगत...दिवसेंदिवस त्याबद्दलचं गूढ माझ्या मनात खोलवर रुतत, रुजत चाललं आहे.

प्रश्नचिन्ह मनाच्या कोपऱ्या कोपऱ्यातून चक्राकार गरगरतय, त्याची तीव्रता मी एकट्याच्या मनान सहन करतोय. घरातल्या कुणालाही एवढीही त्याची झळ पोहोचू नये याची, त्यांना यत्किंचितही जाणीव न देण्यासाठी मनोमन धडपडतोय.

पण मनात याच्याच बरोबर एक शंका पण डोकावत आहे. माझी ही सहनशीलता कायम टिकेल का ? दृष्टांताला अंत आहे की नाही ?

—आणि त्याच विचाराच्या तंद्रीत मी गाडी घेऊन बाहेर पडलो. कुठं जात होतो माझंच मला माहीत नव्हतं. गाडीच्या चाकांना गती आली होती—आणि बरोबर माझ्या विचारांनाही.

शहर सोडून आड रस्त्याला गाडी केव्हा आली, कळलंही नाही. आडवी तिडवी वळणं नि खाचखळगे, गचके खात तशाही स्थितीत मी त्या एकाच विचारानं पछाडल्यागत् गाडी चालवीत होतो.

मनाच्या कोपऱ्यात खोलवर आशेचा अंकूर हळुवार फुलारून येत होता—

—नि गाडी एक जोरदार गचका देऊन बन्द पडली आणि त्याबरोबर माझं विचारचक्रही.


## अक्षरपद्धती, कुटुंबनियोजन आणि कुटुंबसुयोजन

अनैतिक साधने न वापरता मनोवांच्छित संतती होईल. सुयोजनकरता पाळावयाचे दिवस, महिने, चंद्र वगैरेंचा तक्ता उपयोगाच्या माहितीसह रु. १०/— व नियोजनाचा तक्ता रु. ५१/— शिवाय त्यावर Astro-Medical उपाय सांगू. याशिवाय वर्षफल रु. १०/— विवाह प्रश्न रु. १०/— व इतर सर्व कामे केली जातील. भेटण्याची वेळ सकाळी ८ ते ११

पं. वि. म. जोशी, ज्योतिष विशारद
"गीताप्रसाद" आऊट हाऊस, कर्वे रोड, पुणे नं. ४.

अंधुकशा चंद्रप्रकाशात समोर तळं असलेलं दिसलं. तीन बाजूंनी डोंगरानं वेढलेलं हिरवंशार पाणी वाटलं त्या वेळेस. काठावर पर्णहीन चाफा कळ्यांनं डंवरला होता.

आजुबाजूला कित्येक मैलांच्या परिसरात मनुष्यवस्तीचा मागमूसही दिसत नव्हता–

–पण मला मागे फिरावंसं वाटेना. तसाच त्या झाडाखाली बसून राहिलो. आणि त्याच स्थितीत केव्हा डोळा लागला समजलंच नाही–

–तोच दिवस तो. ज्या दिवशी प्रथम दृष्टांत झाला होता...तो. कुठेतरी मी न पाहिलेल्या अशा ठिकाणी उभा आहे...एकटा...अगदी एकटा. माझा मी मला अगदी स्पष्ट दिसतोय. चारी बाजूंना अंधार...अगदी गडद अंधार...पण मी एखाद्या सराईतासारखा तिथं चालत जातोय...

–आणि...

–छोटंसंचं तळं...संथ. तळं दिसणारं. मी पाहातोय...

–पाहता पाहता त्यात एकाएकी जोराची उलथापालथ होत आहे...

–नितळ पाणी क्षणाक्षणाला, त्या उलथापालथीबरोबर गढुळतंय...गढुळतय...

–आश्चर्यानं मी ते सारं डोळे फाडफाडून बघत काठाशी तस्साच उभा आहे... आणि...आणि त्या हेलावणाऱ्या पाण्यातून दोन उजवे हात, फक्त मनगटापुढचेच हेलकावे खाताहेत...

–त्या दोन्ही तळहातांवर मी बाजूलाच डवरून आलेल्या चाफ्याच्या कळ्या तोडून टाकतोय. काही पाण्यात हेलकावतायत, काही अचूक तळहातावर पडताहेत...

...मी त्या हातांना स्थिर करू पाहत आहे...पाहत आहे. पाणी होतं तसं संथ होतं. हाताचे पंजे स्थिरावतात...अन्...दोन्ही तळहातांवर पडलेल्या त्या कळ्या क्षणार्धात फुलतात. पहाटेच्या पहिल्या सूर्यकिरणात दंवावरले दंवबिंदू चमकतात.

माझ्या मनात एकच कल्लोळ उठतो...न पाहिलेल्या आई-वडिलांची मनोमन तीव्र आठवण येते आणि त्या स्वप्नमय स्थितीतही प्रकर्षानं मला जाणवतं, ते अश्रू तिथे नसल्याचं.

ते तृप्त झाले हा विचार मनात स्थिरावतो. मी स्थिर नजरेनं फुलावरचे चमचमणारे दवबिंदू पाहत निश्चल उभा असतो...तस्साच – कितीतरी वेळ अगदी तस्साच...भान हरपल्यागत...

◻ ◻ ◻

# गुयामचे

## युद्ध की वनवास ?

एक वर्ष निघून गेलं होतं. बिचारा उमिनो कुठल्या अवस्थेत दिवस काढत होता कोण जाणे. पण एके दिवशी आमच्यासमोर तो दत्त म्हणून उभा राहिला. त्याची प्रकृती खालावली होती, बराच अशक्त दिसत होता तो ! त्याला सारखी उबळ येत होती. आमच्या अंदाजाप्रमाणे त्याला टी. बी. झाली असावी. त्याची आम्ही आदराने विचारपूस केली. त्याला बराच थकवा जाणत होता.

जो जे गोळा करील तेच त्याने खावे हा नियम उमिनोची ही परिस्थिती पाहून आम्ही रद्द केला. कुठल्याही परिस्थितीत त्याला हवी ती मदत करणे आमचे कर्तव्य होते. शिवाय आमच्याकडून मदत मिळावी याच भावनेने तो आमच्यापाशी आला होता. चार पावले चालायचेही त्राण त्याच्या अंगात नव्हते. त्याला खाण्याची आता इच्छा नव्हती. शेवटी काहीच त्याच्या पोटात जाईनासे झाले. त्यातच खांदेदुखीचा आजार त्याला जडला होता. त्याच्या वेदनेने तो अस्वस्थ झाला होता. त्याला आराम मिळावा म्हणून त्याच्या खांद्याला आम्ही मसाज सुरू केला. त्याची खांदेदुखी त्याच्या साऱ्या सौख्याच्या आड येत होती.

"मी आता थोड्याच दिवसाचा तुमचा सोबती आहे." तो असहायपणे बोलला. मला अतिशय वाईट वाटलं. हा जीवघेणा खेळ कधी थांबणार होता कोण जाणे ! "माझ्या खांद्यावर शस्त्र चालवून त्यातील खराब रक्त बाहेर काढल्यास मला बरं वाटेल." तो म्हणाला.

ते शक्य नसल्याचे त्याला पटवून देण्याचा आम्ही प्रयत्न करत होतो. "उमिनो, तुला खरी गरज आहे ती रक्ताचं. नाहीतर उलट त्रास होणार नाही रक्त बाहेर काढल्यावर ?" मी त्याला समजावणीच्या स्वरात बोललो. पण ऐकण्याच्या मनःस्थितीत तो नव्हता. त्याच्या वेदनेपासून त्याला विरंगुळा हवा होता. त्या यमयातना

## इटो मसाशीच्या एम्परर्स लास्ट सोल्जर्स या पुस्तकाचा परिचय....

वसंत भणगे

लेखांक : दोन

थांबविण्याचा तोच एक मार्ग असल्याचं तो सारखा विनवीत होता. बोलता बोलता त्याला धाप लागली आणि तो जमिनीवर कोसळला. केवळ नाइलाजाने आम्ही त्या गोष्टींसाठी तयार झालो.

मिनाकावाला त्याच्या क्षीण खांद्यावर अगदी थोडंच मांस आढळलं असेल. नाइलाज आणि नाखुषीने त्याने चाकू हातात घेतला. त्याच्या खांद्यावरील बारीकशी चामडी त्याने कापली. त्याच्या पिवळ्या पडलेल्या त्वचेतून एक थेंबसुद्धा रक्त बाहेर आले नाही.

" जास्त, याहून करकरून कापाना !" तो अस्वस्थ होऊन विनवू लागला.

मिनाकावाने थोडीशी जास्त चामडी कापली. उमिनोच्या चेहऱ्यावर थोडंसं समाधान दिसलं. त्याच्या हसण्यातसुद्धा केवढा थकवा होता. कापलेल्या भागावर आम्ही पाला चोळला आणि ती बांधून टाकली. त्याला आम्ही व्यवस्थित झोपविले.

मी आणि मिनाकावा आमच्या निवाऱ्याकडे आलो. किती तरी वेळ आम्हाला झोपच आली नाही. यानंतर उमिनो आणखी रक्त काढून टाकण्यासाठी विनवीत होता. तिसऱ्या दिवशी त्याची प्राणज्योत विझली. त्या शापित बेटावर पाय ठेवण्यास आम्हाला दहा वर्षे पूर्ण होत होती.

हे तीन-चार दिवस आमच्या आयुष्यात अतिशय दुर्दैवी म्हणायला हवेत. त्याची आठवण आली तरी अंगावर शहारे उठावेत. आमचा आशावाद, ध्येयवाद, विजिगीषु वृत्ती यांचा पार चक्काचूर झाला होता. मिनाकावाशिवाय माझं जीवन शून्यच होते. आमचं जीवन एकमेकांसाठी जणू समर्पितच होतं.

अपुरं आणि निकस अन्न, सबंध दिवसभरची अस्वस्थ मनस्थिती आणि कष्टमय जीवन यामुळे आमच्यात शारीरिक आणि बौद्धिक दौर्बल्य वाढत चाललं होतं.

नव्या कल्पना लढवायला आता डोकं सहकार्य देत नव्हतं. मिनाकावासुद्धा आता निराश वाटत होता. कारण रात्रीच्या वेळी त्याला बरंच कमी दिसत होतं.

समुद्राच्या किनारी जाऊन खारं पाणी आणणं आमच्या बाहेरचं वाटत होतं आणि हल्ली एका भावनेने आम्ही पछाडलो गेलो होतो. कुठून तरी, या महिन्यात आमच्यावर हल्ला होणार आहे आणि त्यात आम्ही मारले जाणार आहोत असं सारखं आम्हाला वाटत होतं. या विचारानेच आमची रात्रीची झोप उडाली होती.

पण हळूहळू एका बाबतीत आमच्या मनाची जडणघडण जरा वेगळ्या रीतीने आकार घेत होती. आमच्यातील मानवी मूल्ये संपली असताना आम्ही मरणाला का घाबरत होतो? मरणाहूनही ते जीवन भयंकर होते. आम्ही माणूस म्हणून नाही तर पशूपेक्षाही खालच्या थराचं जीवन जगत होतो. क्वचितच आम्ही बोलत असू. साऱ्या गोष्टी खुणेनेच चालत. आमचे कान आणि डोळे एवढे तरबेज झाले होते की कुठल्याही गोष्टीची जाणीव आम्हाला झटकन् होई. तंबाखूच्या वासावरूनही आमच्या रोखाने कुणी तरी येत असल्यास त्याची जाणीव आम्हाला होई. आमची घाणेंद्रिये अतिशय तरबेज होती. रानातील उंदीरच होतो आम्ही आणि इतर माणसे मांजरासारखी आम्हाला भासत होती.

पण अशाच एका पावसाच्या दिवशी माझ्या या इंद्रियांनी मला चांगलच चकविलं आणि १९५७ साली मी अगदी मरणाच्या उंबरठ्यावर येऊन उभा राहिलो

दोन पत्र्यांच्या आधाराने आम्ही आडोसा तयार केला होता. आग पेटत होती आणि बाहेर भुरभुरणाऱ्या पावसात आम्ही उबदार होतो. सबंध दिवस पाऊस पडत होता एकमेकांसमोर तोंड करून आम्ही बसलो होतो. पावसामुळे आमचा आवाज काही पलीकडे गेला नसता.

" मला खात्रीनं वाटतं की आता युद्ध संपलं आहे—पण असं असलं तर ही रानटी माणसे आमची पाळेमुळे खणण्यासाठी का टपून बसावीत ?"

" मला पण काही कळेनासं झालं आहे. तुला असं वाटत नाही, की, अमेरिकनांनीच हा ससेमिरा आमच्या पाठीमागे लावून दिला नसेल ?"

माझा कंठ दाटून आल्यासारखा झाला. " आमचं नशीबच जर भिकार असेल तर हे कुत्र्यासारखं जीवन आम्हाला जगायला नको काय ? असेच हालहाल होऊन मरायचं नाही तर गोळी झेलून इहलोकाची यात्रा संपवायची एवढंच आता शिल्लक आहे !"

अकस्मात पावसाच्या आवाजाला आरपार कापत जाणारा एक मोठा आवाज माझ्या कर्णेंद्रियांना जाणवला. हा आवाज थोडा मला वेगळा वाटला. मी मागे वळलो. तो काय ? माझ्या समोरच एक धिप्पाड असा कॅमेरो जमातीचा योद्धा हातात बंदूक घेऊन उभा होता.

मी जवळ जवळ किंचाळलोच आणि पावसात मुसंडी मारली. माझ्या पाठीतून कळा येऊ लागल्या आणि मी खाली कोसळलो. उतारावरून चेंडूसारखा मी गड-गडत खाली आलो. मला थांबवणारं, मदतीचा हात देणारं कुणीच नव्हतं. पण तिथं मिनाकावा आला माझ्या मदतीला. मी त्याच्याकडे वेड लागलेल्या माणसासारखं पाहू लागलो.

'इटो, तू ठीक आहेस ना ?' त्याच्या प्रश्नाने मी भानावर आलो. त्याला जखम दिसावी म्हणून मी माझा शर्ट वर केला.

" नशीबवान आहेस तू. नुसती चाटून गेली."

मिनाकावा माझ्याजवळ होता हे माझं केवढं भाग्य होते. मला उबदारपणा मिळावा म्हणून आपले कपडे काढून त्याने ते माझ्या अंगावर चढवले. माझी जखम कोरडी राहावी म्हणून अगदी हळुवार हातानी त्याने ती पुसून काढली. आता मिनाकावा कसला विचार करत असेल ते मला जाणवत होतं. मी जर मेलो असतो तर त्याने आत्महत्याच केली असती आणि माझ्या बाबतीतही तेच घडले असते. त्या प्रसंगात आमच्या मनाची जडण घडण एका नव्या संवेदनेने आकाराला आली.

आमच्या निवाऱ्यापाशी परत आम्ही आलो. एवढा थकवा जाणवत होता की या यमयातनेतून आम्हाला परमेश्वराने सोडविलं असतं तर खात्रीनं चांगलं झालं असतं असं वाटू लागलं. पावसाने टेकडीला बरेच खळगे पडले होते. बाहेर सगळी-कडे सर्दपणा होता. मिनाकावा माझी काळजी घेताना एवढी तत्परता दाखवत होता की ती बघून माझ्या मनाला तजेला आल्यासारखं वाटलं. आता काळजी घे म्हणून एकमेकांना समजावण्याची आवश्यकता नव्हती.

त्यानंतर आमच्यावर क्वचितच हल्ले झाले असतील. तसं त्या मानानं सगळं सुरळीत चाललं होतं. पण पौष्टिक अन्नाच्या अभावाने अशक्तपणा वाढतच चालला होता. हळूहळू मनात गोंधळ वाढत चालला. कारण रानात चक्कर मारून फळं गोळा करणे जड जाऊ लागले. एका रात्री मिनाकावाने एक रानकोंबडी पाहिली. ती मारून खाण्यासाठी त्याची धडपड सुरू झाली. दुसऱ्या दिवशी तो तिच्या मागोवर निघाला. माझ्या अंगात थकवा असल्यामुळे मी त्याच्या बरोबर जाऊ शकलो नाही.

मी एकटाच बसून आराम करत होतो. मिनाकावा परतला नव्हता. मला भूक लागली होती. भुकेपोटीच की काय माझ्या मनात नको नको ते विचार थैमान घालू लागले. मिनाकावा परतत नव्हता आणि माझी अस्वस्थता जास्तच वाढत चालली होती. आम्ही बाहेर पडताना नेहमी एक संकेत पाळायचं ठरविलं होतं. बाहेर गेल्यानंतर दोन तासांनी कुठल्याही स्थितीत परत मागे फिरायचं. दोन तासां-हून जास्त वेळ बाहेर राहायचे नाही, असं आम्ही ठरविलं होतं. दोन तास निघून गेलेत. तीन तास झालेत. मिनाकावा परतला नव्हता.

दुपार झाली. मी उठलो आणि बाहेर पडलो. जिथं रानकोंबडी आम्हाला दिसली होती तिथं मी आलो. तिथं तो नव्हता. आमच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मी त्याला तोंडानं शिळ घालून इशारा केला. पण त्याची चाहूल लागली नाही. कुठलाच प्रतिसाद मिळाला नाही. पुढे नारळाची एक मोठी बाग होती. तिथं मी आलो. मिनाकावा निदान तिथं तर सांपडेल असं मला वाटलं होतं. पण तिथंही तो नव्हता. माझा गोंधळ उडाला. हातपाय कापू लागले. मला वाटलं तो जखमी होऊन कुठल्यातरी झाडाच्या बुंध्याशी पडला असेल म्हणून प्रत्येक झाडाशी जाऊन मी पाहण्याचा प्रयत्न सुरू केला. अशी किती तरी झाडे पाहून झाली. पुढे काही अंतरावर मला पाण्याची एक पिशवी आणि पायातील सँडलचा जोड दिसला. तो खात्रीने मिनाकावाचाच होता.

मनात नको नको त्या विचारांनी थैमान घालायला सुरुवात केली. तरी पद्धतशीरपणे मी त्याचा शोध चालूच ठेवला. दुपार कलायला लागली होती. मला वाटत होतं की मिनाकावा गस्त घालणाऱ्या पथकाच्या दृष्टीस पडला नसावा. नाहीतर बंदुकीच्या गोळीचा आवाज माझ्या कानी पडला असता. नाही तर तो जखमी होऊन कुठं तरी पडला असेल आणि मला साद घालण्याचं त्राणही त्याच्यात नसेल. कदाचित अमेरिकन सैनिकांनी त्याला पकडूनही नेलं असेल. आमच्या माहितीप्रमाणे शत्रूंची जी माणसे त्यांच्या हाती पडत त्यांना ते कधीच जिवंत सोडत नसत. आता कसलाच विचार करू नये असं मला वाटू लागलं. चिखलातच राहावं लागणार असल्यास आंघोळ करून काय उपयोग असतो. आता कुठलीच गोष्ट माझ्या मनासारखी घडणार नव्हती. मग विचार का आणि कसा करावा याचंच कोडं मला पडलं होतं

तरी माझ्या विचारांची समाधी आकाशात घोंघावणाऱ्या हेलिकॉप्टरच्या आवाजाने भंग पावली. झाडाच्या शेंड्याच्या अगदी ते नजीक आलं. मी झाडाच्या पानाच्या आडोशातून डोकावून पहात होतो. त्यातील एंजिन मला स्पष्ट दिसत होतं. माझ्याच रोखाने ते खाली येऊ लागलं. ते एवढे जवळ आलं की, त्यातील माणसे माझे फोटो घेत असल्याचं मला स्पष्ट दिसलं.

मी झाडीत धूम ठोकली. अडचणीच्या जागी जाण्याचा प्रयत्न केला. नाहीतर मला फुलपाखरासारखं अलगद उचलून न्यायला त्यांना जड गेलं नसतं.

आता पळण्यात तसा काहीच अर्थ नव्हता. प्रतिकार तर आवाक्याबाहेर होता. शेवटी सगळाच उशीर झाला होता. त्यांनी मला बरोबर टिपलं होतं. वरून त्यांचं माझ्यावर कसं काय लक्ष गेलं कुणास ठाऊक. लांब पळून गेलो असतो तर काही मिनिटांच्या आतच तेवढं अंतर कापायायला त्यांना सहज शक्य होतं. शेवटी थांबून काय होतं हेच पाहण्याचं शिल्लक राहिलं. माझ्याकडील महत्त्वाच्या गोष्टी अमेरिकनांच्या हाती पडू नयेत म्हणून मी त्या अडचणीच्या जागी फेकून दिल्या.

डायरी फेकताना मला किती तरी यातना झाल्या. डायरीत शेवटची तारीख मी लिहिली होती १६ मे १९६०. मी पठाराच्या पायथ्याशी कोकरू लांडग्याच्या तावडीत सापडल्यावर जसं दिसेल तशा अवस्थेत असहाय्यपणे उभा राहिलो.

सबंध मार्ग खाचखळग्यांचा होता. माळावर चढून वर जावंसं मला वाटलं. मी सहज वर पाहिलं. टेकडीच्या माथ्यावर माझं लक्ष केंद्रित झालं. चार अमेरिकन सैनिक माझ्याच रोखानं पाहत उभे होते.

मी पुतळ्यासारखा निश्चल उभा होतो. माझ्या डोक्यात, मनात आता कसलाच विचार आला नाही. सगळ्याच भावनांच्या पलीकडे मी गेलो होतो. त्यातील एक माझ्याच रोखाने पुढे सरसावला. माझं रक्त गोठलं होतं. हृदय बंद पडल्यासारखं वाटू लागलं. गुळगुळीत दाढी आणि व्यवस्थित कपडे घातलेला तो माणूस दुसरा तिसरा कुणी नसून मिनाकावाच होता हे पाहून मी गारच पडलो.

त्या कपड्यात तो रुबाबदार दिसत होता. आमची दृष्टादृष्ट झाल्यावर तो हसला.

" आता नशिबानंच चटकन् आपली गाठभेट झाली. नाही तर तुला कुठं शोधावं हा प्रश्नच पडला असता माझ्यासमोर. " तो शांतपणे म्हणाला.

मिनाकावा मला परत दिसला याचा मला एवढा आनंद वाटला की, त्याचं नाव मोठ्यानं घेऊन त्याचाच नामघोष करावा असं मला वाटू लागलं. आता मरण आलं तरी आम्ही दोघं एकत्र होतो हेच मला समाधान वाटू लागलं.

आम्ही बोलत असताना त्या तीन अमेरिकनांनी आमच्यात आणि आपणात खुबीदारपणे अंतर ठेवले होते. ते आता पुढे सरकू लागले.

" कसं काय चाललं आहे ! आता ठीक असेल नाही !" त्यातील एक अमेरिकन सुहास्य वदनानं मला म्हणाला. त्याच्या बोलण्यात प्रांजलपणा होता आणि कुठलीच खोच नव्हती.

" मी आता हेलिकॉप्टरमध्येच होतो. " तो मला आश्चर्य वाटेल अशा भावनेने म्हणाला " आमची कल्पना नव्हती की एवढं अंतर चालून तू इथपर्यंत आला असशील ! "

थोड्याच अंतरावर एक लॉरी उभी होती. आम्ही तीत चढलो. मला वाटत होतं की, केवळ ठार मारण्यासाठीच ते आम्हाला नेत असावेत. लॉरी सुरू झाली, जंगल मागे पडत होतं आणि आमच्या निवाऱ्यापासून आता खरोखरच दूर कुठं तरी आम्ही चाललो होतो. तब्बल सोळा वर्षं त्या जंगलात आमचं आयुष्य कुजलं होतं. आम्ही पुरे गाडलो गेलो होतो तिथं.

मिनाकावानं घडलेलं सर्व मला सांगितलं. रानकोंबडीचा नाद त्याला सोडावा लागला. कारण ठरलेल्या वेळेत त्याला परतायचं होतं. येताना नारळ आणावे म्हणून तो त्या नारळाच्या बागेत शिरला. तेवढ्यातच रानटी माणसांची टोळी

# छोटया बचतींवर वाढीव व्याजाचे दर मिळवा

मध्यवर्ति सरकारनें जाहीर केलेले वाढीव व्याजाचे दर खालीलप्रमाणे आहेत:

# आतां तुम्हीं बचत करणें टाळूं शकत नाहीं !

| | जुने दर (वार्षिक) | नवे दर (वार्षिक) |
|---|---|---|
| टपाल कचेरीची बचत बॅन्क | | |
| 1) एकाचे, दोघांचे आणि भविष्यनिधीं खातें | 3½% | 4% |
| 2) किमान 100 रु. वर्षभर ठेवल्यास | 4% | 4½% |
| 3) दोन वर्षांसाठीं अडकविलेली अनामत | 4½% | 4½% |
| टपाल कचेरीतील मुदतीच्या ठेवी | 5½% ते 6¾% | 6% ते 7¼% |
| टपाल कचेरीच्या फेर गुंतवणूक अनामती | 6½% | 6¾% |
| सप्त वर्षीय राष्ट्रीय बचतपत्रें (चतुर्थ संस्करण) | 7½% | 7½% |

अधिक तपशीलासाठीं तुमच्या नजीकच्या टपाल कचेरींत चौकशी करा किंवा तुमच्या राज्याच्या अल्पबचत विभागीय संचालकांना पत्र लिहा

राष्ट्रीय बचत संघटना

तेथे येऊन थडकली. त्यांना पाहून त्याने पळ काढला. पायातील सँडल तेथेच टाकून दिले. शेवटी त्या टोळीने काही अंतरावरच त्याला गाठलं. पण ठार मारलं नाही. अमाना येथील अमेरिकन नाविक दलाच्या दवाखान्यात त्याला आणून दाखल केलं गेलं. तेथे त्याला बरेच बारिक सारीक प्रश्न विचारण्यात येऊ लागले. एक माणूस एवढा प्रदीर्घ काळ एकटा जंगलात राहूच शकणार नाही हे त्यांनी बरोबर ओळखलं होतं. त्याचा कोण तरी सोबती जरूर असायलाच हवा हे गणित त्यांनी मांडलं. मग मिनाकावाच्या केवळ नाइलाज म्हणून माझ्याबद्दल सांगावं लागलं.

हॉस्पिटलमध्ये आल्यावर माझ्या अंगावरील ते ओंगळ कपडे उतरविण्यात आले. गरम शॉवरखाली मी आंघोळ घेत होतो. मी एवढा सुखावलो की क्षणभर मला वाटलं मी स्वप्नात तर नाही ना! लाँड्रीतून आणलेला गरम गरम शर्ट आणि पायजमा मला देण्यात आला. स्वच्छ धुतलेल्या कपड्यांचा वाससुद्धा मी विसरलो होतो. माझी तेथील लष्करी डॉक्टरनी अगदी कसून तपासणी केली. प्रकृतीत तसा काहीच दोष आढळला नाही. मलाच फक्त अशक्तपणा जाणवत होता. मग मला न्हाव्याच्या दुकानात आणण्यात आलं. केस जवळजवळ साठ सेंटिमिटर वाढले होते. मी त्याचा अंबाडा बांधत होतो. ते कापून ते टोपलीत टाकण्यात आले. पण मी त्यांना तसं न करू देता ते माझ्यासाठीच राखून ठेवण्यास सांगितले. त्याने माझी गुळगुळीत दाढी केली. माझे ते बरेच वाढलेले केस हसत हसत त्या न्हाव्याने माझ्या हातात दिले. मला आश्चर्य वाटत होतं की, या लोकांना आम्हाला भिंती-समोर उभं करून गोळ्याच घालायच्या असल्यावर हा व्यर्थ खटाटोप का म्हणून चालविला जात आहे?

पहिलं जेवण जे पोटात पडलं ते स्वर्गीय वाटलं. पाव एवढा पांढरा शुभ्र वाटला की तो एवढा पांढरा शुभ्र असूच शकणार नाही हे मी पुरे विसरलो होतो. मी आता मिनाकावाबरोबर जेवण घेत होतो. बरोबरच इतर गोष्टी करत होतो. बरेच अमेरिकन आमच्या आजूबाजूला होते. ते आमच्याकडे कौतुकाने पहात होते. हा सुद्धा त्यांचा एक डाव असेल असं मला वाटत होतं.

नंतर आम्हाला एका बंद खोलीत विसावा घेण्यासाठी ठेवण्यात आलं. आम्ही दोघांनी मनमोकळेपणे बोलावं हाच त्यातील उद्देश असावा.

"ते आम्हास जपानला पाठवतील यावर माझा विश्वास बसत नाही."

"मला पण तेच वाटतंय!" मिनाकावा.

"आपण जागरूक राहणं हे चांगलं!"

आम्ही अजूनही दबलेल्या आवाजात बोलत होतो. प्रत्येक गोष्टीचा कानोसा घेत होतो. अरण्यातील ती सवय मात्र गेली नव्हती.

दुपार झाली. आमची मुलाखत ठरली होती. आम्हाला दिवाणखान्यात आणण्यात आले. आमची मुलाखत घ्यायला वातमीपत्रांचे वार्ताहर, छायाचित्रकार, पत्रकार

आणि बरीच हौशी माणसे जमली होती. आज किती तरी वर्षांनी एवढी माणसे आमच्याभोवती जमलेली आम्ही पहात होतो. सुरुवात झाली. कुजबुज वाढली. प्रश्नांचा भडीमार सुरू झाला. उसंत न देता प्रश्न फेकले जात होते. गम्मत जम्मत, जिज्ञासा सगळ्या प्रकारचे प्रश्न विचारले जात होते. लहान मुलांना वडील माणसे जशी प्रश्न विचारतात अगदी तशीच आमची अवस्था झाली होती. डोकं सुन्न झालं. सगळ्या प्रश्नांचा रोख ठराविक वर्तुळातच फिरत होता. खाण्याचे पदार्थ संपल्यावर तुम्ही काय केलं ? युद्ध संपल्याचं तुमच्या कधी ध्यानी आले ! तुमच्या घरच्या माणसांची तुम्हाला आठवण येत होती काय ? तुम्हाला का जगावंसं वाटत होतं ? आता तुम्हाला जपानला जावंसं वाटतं का ?

प्रश्न सोपे होते. पण प्रत्येक प्रश्नाचं उत्तर थोडक्यातच देण्याचा आम्ही प्रयत्न करत होतो.

थोड्या वेळानं वार्ताहरांनी आम्हाला जपानशी फोनवरून संपर्क साधून दिला. मी माझ्या बहिणीशी बोलत होतो. पलीकडून खूप माणसांच्या गडबडीचा आवाज येत होता. मी माझ्या बहिणीशीच बोललो की काय कुणास ठाऊक. मी बराच साशंक होतो. मिनाकावाने माझ्यामागून फोन हातात घेतला. त्याची अवस्थाही माझ्यासारखीच झाली.

" होय...मी मिनाकावा बोलतो आहे, माझी बहिण त्सुरु...त्सुरू काय ?— होना. सांगेन की, आमच्या पाठीमागे किती एकर जमीन आहे तो–बरोबर. नाही विसरलो. आजोबाचं नाव माहीत आहे मला. छान...हो बरं मग आता जायचा नको काय !"

आमचा पुरा गोंधळ उडाला होता. आम्ही खरोखरच जपानमधील आमच्या नातलगांशी बोलत होतो की कुणास ठाऊक. सगळंच आश्चर्यकारक वाटत होतं. कदाचित जपानला गेलो तर आपल्या माणसांना भेट काय द्यायची हा प्रश्न सहज मनात येऊन गेला.

दुसरा दिवस उजाडला. आम्हाला परीटघडीचे कोरे करकरीत कपडे घालण्यासाठी देण्यात आले. आमची टोकिओला रवानगी करण्याची तयारी सुरु झाली. मिनाकावाला अजूनही वाटतं नव्हतं की आपल्या मातीला आपले पाय परत लागतील म्हणून. माझ्याहून त्याचा परमेश्वरावर जास्त हवाला होता. मला मनातून वाटत होतं की विमानातून आम्हाला आता समुद्रात फेकण्यात येईल.

विमानाने आकाशात झेप घेतली. त्या सबंध विमानात आम्हीच दोघे केवळ जपानी होतो. मग जास्तच धास्ती वाटू लागली. मी खाली बघितलं. खाली अथांग पॅसिफिक महासागर पसरला होता. माझ्या डोळ्यातून अश्रू गळायला लागले. ते गालावरून ओघळत असतानाच मी माझं डोकं खिडकीत भिडवलं. जाऊदे त्या जंगलातील गुलामगिरी तर संपली होती. याचंच मला जास्त समाधान वाटू लागलं.

विमान जमिनीवर झेपावलं. माझ्या अंगात एक नवीन हुरूप आला. विमान स्थिरावलं. सगळेजण उतरलेत मी आणि मिनाकावा सर्वात शेवटी होतो. तो दारापाशी आला. मी त्याच्या पाठीमागे होतो.

" बन्झाइ ! बन्झाइ !! "

विमानतळावर चौफेर आवाज घुमत राहिला. आमच्या नावाचा जयजयकार चालला होता. आम्ही ओशाळलो. आमच्या स्वागतासाठी प्रचंड गर्दी जमली होती. गर्दीत बरेच फलक झळकत होते. फलकांवर माझं नाव ठळकपणे लिहिलेलं मी पाहिलं. हसावं की, ओक्साबोक्शी रडावं हेच मला समजेना.

आम्ही इमारतीच्या बाहेर आलो. गर्दीच्या लाटा सारख्या उठत होत्या. माणसे पुढे पाठीमागे सारखी होत होती. आम्ही तर साधे सैनिक, रणांगणावर युद्ध जिंकून आलेल्या वीरांचंही एवढं स्वागत झालं नसतं एवढं आमचं कौतुक होत होतं. मी थबकलो. माझ्या मातृभूमीला माझे पाय तर लागले होते. मी सुखावलो. कृतार्थ झाल्यासारखं मला वाटू लागलं.

आमच्या समोवती आमच्या हितचिंतकांची प्रचंड गर्दी उसळली होती. त्या गर्दीत मी माझ्या आईचा चेहरा शोधत होतो. ती कुठं तरी दूर सारली गेली होती. गर्दीला उधाण आलं होतं. प्रत्येकाच्या सदिच्छेचा स्वीकार करत असतानाच माझी आई मला एकदम गवसली. माझे हात तिच्या खांद्यावर पडले. तिला मी छातीशी घेतलं. माझी बहीणही तेथे आली. दोघांनी मला अत्यानंदाने कवटाळलं. त्या स्पर्शातच सदैव न्हाऊन निघावं असं मला क्षणभर वाटलं—

# स मा प्त

२० मार्च १९७१

श्रीकृष्ण दातार

# शिवरात्र

## परखड विचार, खटकणारे अनुल्लेख

'रूपवेध', 'मागोवा' आणि 'जागर' या पूर्वीच्या लेखसंग्रहानंतर आता प्रा. नरहर कुरुंदकर 'शिवरात्र' हा आपल्या त्यानंतरच्या लेखांचा संग्रह घेऊन मराठी वाचकासमोर आले आहेत. यातील सर्व लेख राजकीय असून ते 'साधना', 'सोबत', 'नवभारत' इ. नियतकालिकातून प्रसिद्ध झालेले आहेत. लेखनाचे निमित्त दरवेळी थोडेसे प्रासंगिक असले तरी त्यातून मांडलेले विचार मौलिक आणि विचारप्रवर्तक असल्यामुळे त्यास ग्रंथरूपाने टिकाऊ रूप दिल्याबद्दल वाचक साधना-प्रकाशनाचे आभार मानतील. कमीअधिक दोनशे पृष्ठांच्या या पुस्तकात प्रा. कुरुंदकरांचे नऊ लेख पुनर्मुद्रित करण्यात आले असून पुस्तकाच्या तीन भागात प्रत्येकी तीन लेख अशी विभागणी केली आहे. विषयांच्या अनुरोधाने ही मांडणी असल्याने स्थूल मानाने पहिल्यात हिंदुत्ववादी विचार-प्रणालीला विरोध, दुसऱ्यात व्यक्ति व विचार, तर तिसऱ्या भागात राष्ट्रद्रोही मुस्लिम जातीयवादाचा समाचार अशा अनुक्रमाने विषय आलेले आहेत. एकेका विभागाच्या वाट्यास ८५, ५५ व ५० अशी पृष्ठसंख्या आली आहे. यापैकी पहिल्या भागातील पहिला लेख 'गोळवलकर गुरुजी आणि म. गांधी' अधिक आटोपशीर असता तर प्रत्येक विभागातील पृष्ठ-संख्याही जवळपास सारखी झाली असती.

पण पहिल्या लेखाचा विषयच असा होता की तो आहे याहून कमी विस्तृत होणे शक्य नव्हते. देशातील आम जनतेला बलाढ्य अशा ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध स्वातंत्र्याच्या लढ्याला आत्मबळाने प्रेरित करणारे महात्मा गांधी, आणि मध्यम-वर्गीय तरुणांना हाताशी धरून संघटनेसाठी संघटना पाहिजे व अजून कृतीची वेळ आली नाही असे सांगत त्यांना स्वातंत्र्योत्सुक जनतेपासून चार हात दूर ठेवू पहाणारे सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांच्यामध्ये केवळ एकाच देशाचे रहिवासी याखेरीज एकही समान दुवा नव्हता! उलट गांधीजींची व गांधीवादाची कुचेष्टा आणि उपहास संघस्थानावरून भगव्या ध्वजाच्या साक्षीने वर्षानुवर्षे होत राहिला. अशा स्थितीत एके दिवशी सकाळी गुरुजींनी म. गांधींना श्रद्धांजली वहावी, राष्ट्र-पिता म्हणून गौरवावे, यामुळे कुरुंदकरांसारख्या राष्ट्रसेवादलात वाढलेल्या संयमी,

विवेकी माणसाचा सात्त्विक संताप उफाळून त्यांनी संघाचा दंभ व संधिसाधूपणाचा बुरखा ओढून काढून टरकावून टाकावा व त्यांना खडे तात्त्विक बोल—कितीही कटू असले तरी—सुनावण्यास प्रवृत्त व्हावे यात नवल नाही. कुरुंदकरांची शैली तशी त्रोटक, वाचकाला इतिहासाचे बरेच ज्ञान आहे असे गृहीत धरून सूत्र रूपाने मांडणी करणारी, थोड्या शब्दांनी पुष्कळ सूचित करणारी अशी आहे. अन्यथा या विषयावर एखादा स्वतंत्र ग्रंथ त्यांना लिहिणे सहजशक्य आहे.

## काही प्रश्नांचा फेरविचार

हिंदू समाजात माझ्यासारखी पोटापाण्याच्या व्यवसायात मग्न असल्याने, कोणत्याही राजकीय पक्षात सक्रिय भाग न घेणारी पण डोळसपणे नित्य वाचन, मनन करून परिस्थितीचे अवलोकन व आकलन करू पाहणारी हजारो माणसे असतील. लहानपणापासूनचे काही संस्कार असतात आणि ज्या परंपरांचे बुद्धिवादाने समर्थन करता येत नाही. त्याच्याविषयीही मनात खोल कुठेतरी आपुलकी असते. या कारणाने रा. स्व. संघ, गोळवलकर गुरुजी, आर्यसमाज, हिंदुमहासभा यां विषयी मनात मऊ कोपरे (Soft Corners) राखीव असतात. मते काही पटोत, काही न पटोत हे स्वार्थत्यागी हिंदु संघटक आपलेच लोक आहेत ही समजूत दृढमूल झालेली असते. 'शिवरात्र' या संग्रहातील पहिले दोन लेख (१) 'गोळवळकर गुरुजी आणि म. गांधी' व (२)'गोळवलकर गुरुजी व चातुर्वर्ण्य' हे लेख वाचून म्हणूनच मेंदूला धक्के जाणवू लागतात, अनेक पूर्वग्रह वितळू लागतात हे मान्य करावयास हवे. काही ओळींच्या मधून एक लपलेला नवा अर्थ प्रतीत होऊ लागतो. गांधीजींच्या देशविमोचनाच्या चळवळीत हिंदुत्ववादी तटस्थ राहिले, त्यांनी या आंदोलनाची टवाळी करीत राहण्याचा उद्योग केला ही माहिती काही नवीन नसते. परंतु कुरुंदकरांचे त्यावरील भाष्य— विशेषत: (१) "आपल्याच अवयवांच्या प्रत्येक विकासाला विरोधी असणाऱ्या शरीराप्रमाणे हिन्दुत्ववाद्यांची वागणूक राहिली." (२) "दुर्दैवाने आपल्याच देशातील हिंदुत्ववादी पक्षांना हिंदू जनतेविषयी कवडीइतकी आस्था पूर्वी कधी वाटली नाही. आजही जनतेची आस्था हिंदुत्ववादाला दिसत नाही. (३) मुसलमानांच्या तरवारी आणि धार्मिक अत्याचार जे सातशे वर्षात करू शकले नाहीत इंग्रजांच्या आधुनिक विद्या जें शंभर वर्षात करू शकल्या नाहीत ते कार्य हिंदुत्ववादी शक्तींनी पन्नास वर्षात सफल केले!! हिंदुत्ववाद्यांची इच्छा होती हिंदूंनी मुसलमानांचा, इंग्रजांचा द्वेष करावा. प्रत्यक्षात घडले ते इतकेच की या जनताद्रोही राजकारणाने हिंदू लोकांना हिंदू धर्माचा द्वेष करण्यास शिकविले!"......असली खोल अर्थ असलली वाक्ये वाचून काही प्रश्नांचा फेरविचार आपल्या मनाशी करावासा वाटू लागतो. असली सूत्रबद्ध वाक्ये, स्पष्टार्थवाहक शब्दयोजना आणि परखड प्रांजळपणा ही कुरुंदकरांच्या लेखनातील वैशिष्ट्ये या संग्रहातही प्रकर्षाने आढळतात.

गोळवलकर गुरुजींनी चातुर्वर्ण्याचे जाहीर रीतीने समर्थन केले त्या वेळी सामान्य

सुशिक्षितांची प्रतिक्रिया खेदाची होती. परंतु गोळवलकरांच्या विचाराची ही अपरिहार्य परिणती आहे, ते त्यांच्या आजवरच्या तत्त्वप्रणालीशी सुसंगत आहे, त्यांचेकडून अन्य कशाची अपेक्षा करणेच भोळसटपणाचे आहे असे जेव्हा कुरुंदकर पटवून देतात तेव्हा त्यांचे युक्तिवाद खोल जाऊन भिडतात व वाचकाला अंतर्मुख करतात.

## मतभेद होऊ शकतात

म. गांधींवरील मुस्लिमांचा अनुनय आणि आत्यंतिक अहिंसा हे जे दोन आरोप नेहेमी केले जातात त्यांची उत्तरे मात्र तितकी बिनतोड वाटत नाहीत. अहिंसा ही गांधीजींची वैयक्तिक श्रद्धा होती, काँग्रेसने तिचा स्वीकार केलाच पाहिजे अशी अट त्यांनी कधीं घातली नाही, हे म्हणणे निर्भेळ सत्य आहे काय ? या बाबतीतला म. गांधींचा आग्रह त्यांच्या अनुयायांना पुष्कळ प्रसंगी नडला. १९२१ साली देशव्यापी सत्याग्रहाचे आंदोलन ऐनभरास आले असता उत्तरप्रदेशांत चौरीचौरा येथील हिंसक प्रकाराचे कारण सांगून गांधीजींनी अचानक चळवळ थांबवण्याचा आदेश दिला व सहकाऱ्यांचा रोष ओढवून घेतला. तसेच १९४० सालच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीपुढील युद्धविषयक ठराव व त्या वरील चर्चा, हा सर्व इतिहास एक निराळे चित्र उभे करीत नाही काय ? गांधीजींचे अनेक भक्त अहिंसावादावर निष्ठा ठेवणारे नव्हते, हे आज सांगत असताना बेचाळीसच्या लढ्याचा उल्लेखही येऊ नये यांचे आश्चर्य वाटते ! कारण ९ ऑगस्ट १९४२ रोजी काँग्रेस वर्किंग कमिटीचे सर्व नेते पकडले गेल्यानंतर जे एक पर्व घडले, ते येथल्या कुरुंदकरांच्या विवेचनाला अनुकूल होते. कदाचित पुढे येणारे विवेचन (सशस्त्र उठावातील धोके, आधुनिक प्रगतीला खीळ, औद्योगिक पिछेहाट) त्याच्याशी ते सुसंगत दिसणार नाही हे या अनुल्लेखाचे एक कारण असू शकेल. दुसरा एक अनुल्लेख खटकतो तो सुभाषचंद्र–सावरकर यांच्या भेटीचा. विवेचनाच्या ओघात हा उल्लेख शक्य होता. एवढेच नव्हे तर औचित्यपूर्ण ठरता. या उल्लेखामुळे त्यावेळच्या गायकवाडवाड्यातील निष्क्रिय राजकारणाकडे काही श्रेय जाते असे मानण्याचा वेडेपणा कोणी करू शकणार नाही. पण स्वातंत्र्यवीरांना योग्य तो न्याय मिळतो हेही खोटे नाही.

या नंतर पुस्तकाच्या पहिल्या भागातील शेवटचा लेख. श्री. गोपाळ गोडसे यांनी लिहिलेल्या आणि बराच गाजावाजा झालेला 'गांधीहत्या आणि मी' या पुस्तकाचे हे परीक्षण आहे. मराठी पुस्तक प्रकाशनाच्या व्यवसायात या पुस्तकाने विक्रीच्या बाबतीत बराच विक्रम केला आहे. म. गांधींना श्रद्धास्थान मानणाऱ्या कुरुंदकरांनी गांधीजींचे वा गांधीवादाचे समर्थन करण्याचे टाळून आणि आरोपीचे हेतू हीन न मानता या पुस्तकाविषयी आपल्या प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. पुस्तकाला वस्तुनिष्ठ मूल्य फारसे नाही, गांधीजींवरचे आरोप पूर्वग्रहदूषित आहेत आणि फासावर गेलेल्या आरोपींना हुतात्मे मानता येत नाही या त्यांच्या निष्कर्षांशी वाचक सहमत होतील. सौ. सिंधू गोडसे यांच्या स्वाभिमानी आणि करारी कर्तृत्वाबद्दल त्यांचे कौतुक केले आहे ते योग्यच दिसते.

सरदार वल्लभभाई पटेल आणि सावरकर यांच्याविषयी गोपाळ गोडसे यांनी केलेली विधाने कुरुंदकरांना बेजबदारपणाची वाटतात. मी त्यांना कृतज्ञतेच्या भावनेवर आधारलेला शिथिलपणा समजतो. उदा. १९४८ साली कांग्रेस सरकारने हैद्राबाद संस्थानाविरुद्ध कारवाई करून तेथील हिंदू प्रजाजनांचा गजेंद्रमोक्ष केला या कार्यवाहीचे एकमेव विधाते म्हणून हिंदू लोकांचे मनात सरदारांविषयी एक विशेष प्रेमाची व कृतज्ञतेची सार्वत्रिक भावना रुजलेली आढळते. या भावनेला आधार काय आहे? भारतीय केंद्रीय मंत्रिमंडळातील संयुक्त जबाबदारीचे तत्त्व, पंतप्रधान या नात्याने शेवटचा शब्द सांगण्याचा अधिकार पं. नेहरूंचा होता इ. गोष्टी जनतेला माहीत नाहीत काय? तरी लोकांना असे ठामपणे वाटते की पटेलांचा करारी स्वभाव, हिंदु धर्माविषयीची आत्मीयता आणि धैर्य यामुळेच रझाकारांच्या संकटातून आपली सुटका झाली. हे म्हणताना अनेक लोकांचा कंठ सद्गदित होतो हे मी प्रत्यक्ष डोळयांनी पाहिलेले आहे. आता पोलीस कार्यवाहीचे श्रेय पं. नेहरूंना न देता ते सर्वस्वी सरदारांना देतात हे लोकांचे कृत्य बेजबाबदार म्हणता येईल काय? बुद्धीचा व वस्तुस्थितीचा काटेकोरपणा भावना दुर्लक्षित करते एवढे म्हणता येईल.

पुस्तकाचा दुसरा म्हणजे मधला भाग ( १ ) खान अबदुल गफारखान, ( २ ) मौलाना आझाद : एक स्मरण आणि ( ३ ) भाई अच्युत पटवर्धनांच्या सहवासात एक दिवस अशा तीन लेखांचा आहे. गतवर्षी सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान या देशात येऊन ४-५ महिने वास्तव्य करून, सर्वदूर दौरा करून परत गेले. त्यापूर्वी ते येण्याच्या नौबती झडत होत्या, त्या वेळी पहिला लेख लिहिला गेला. त्यानतरचे त्यांचे आगमन, भाषणे, अहमदाबादच्या दंगलीनंतरची त्यांची गुजराथ भेट, भ्रमणगाथा, त्यांना जनतेने गोळा करून अर्पण केलेले निधी, त्यांचा विनियोग या संबंधी वृत्तपत्रांतून बरीच उलट सुलट चर्चा झाली. ते स्वदेशी जाऊनही आता बराच काळ लोटला. तरी त्यांच्या दौऱ्यासंबंधी काही ना काही ध्वनी प्रतिध्वनी अजून उमटत असतात. या सर्व घडामोडींमुळे या लेखाचे प्रासंगिक स्वरूप जसे अधिक स्पष्ट होते, त्या मानाने खानसाहेबांचे व्यक्तिमापन चिरकालीन महत्त्वाचे असूनही खोल ठसा उमटवू शकत नाही.

मौलाना आझाद यांच्या व्यक्तिमत्त्वाची मात्र एक अज्ञात बाजू त्यांच्यावरील लेखात नव्याने वाचकापुढे आली आहे. ती म्हणजे मौलानांनी केलेले कुराणावरील उदारमतवादी भाष्य. अम्मजुल वाहिदा हे प्रकरण काय आहे हे आपण जेव्हा कुरुंदकरांकडून समजून घेतो तेव्हा मौलानांच्या व्यक्तिमत्त्वावर एक नवा प्रकाशझोत पडून त्यांच्याविषयी एक विस्मयमिश्रित अशा आदराची भावना निर्माण होते. जिज्ञासा, शंका, प्रश्न, चिकित्सा, या सर्व बाबींना मज्जाव असलेल्या रुक्ष वाळवंटात स्वतंत्र प्रज्ञेचे एक तुळशीचे रोप उगवले, वाढले, या माहितीत कुतूहल व रस वाटणार नाही असा वाचक आढळणार नाही. अलीकडे सेवानिवृत्त सनदी व

लष्करी अधिकारी फाळणीपूर्व व फाळणीकालीन घटनांची जी वर्णने आता हे सांगायला हरकत नाही. (Now it can be told) असल्या अर्थाची लेखने छापून मुख्यत: इंग्रजीतून करीत आहेत, त्यातून येणारे मौलाना आझादांच्या तत्कालीन भूमिकेबद्दलचे उल्लेख त्यांच्यावरील श्रद्धेची उंची वाढविणारे नाहीत. उलट मौलानांच्या निष्ठांविषयी शंका उत्पन्न करणारे आहेत. या पार्श्वभूमीवर कुरुंदकरांचा हा लेख आझादांच्या धूसर होत चाललेल्या चित्राची उज्ज्वल बाजू स्पष्ट उजेडात धरणारा ठरेल.

व्यक्ती आणि व्यक्ती–चिंतनात्मक भागातील तिसरा म्हणजे शेवटचा लेख 'अच्युतराव पटवर्धनांच्या सहवासात एक दिवस' हा आहे. समाजवादी विचाराच्या काँग्रेसनिष्ठ तरुणांनी काँग्रेसमधून बाहेर पडून आपली लहानशी नाव भारतीय राजकारणाच्या समुद्रात एकाकीपणाने वल्हवीत सोडली या गोष्टीस आता जवळजवळ दोन तपे पूर्ण झाली. या नावेतील बहुतेकांच्या तोंडाभोवती ४२ च्या क्रांतिपर्वाचे तेजोवलय असल्यामुळे सर्वांना त्यांच्याविषयी आदर वाटतो. या एकांड्या शिलेदारांपैकी पटवर्धन बंधू हे बिनीचे सरदार होत. त्यापैकी रावसाहेब पटवर्धनांचे नुकतेच दु:खद देहावसान झाले. अच्युतरावही राजकारणाच्या धकाधकीतून निवृत्त झाले आहेत. तरी एकेकाळी सर्वांच्या प्रेमादराचा कारभार मानाने स्वीकारणाऱ्या या तपोवृद्ध व वितराग नेत्याचो चालू विचार-प्रवाहावरील मते समजावून घेण्याची उत्सुकता जनतेस राहीलच. श्री. अच्युतराव गेल्या साली पीपल्स कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून नांदेडला आले असताना कुरुंदकरांनी त्यांच्याशी विविध विषयांवर जी चर्चा केली तिचा वृत्तान्त सदरहू लेखात थोडक्यात देण्यात आला आहे. वाचकांना ज्यात रस वाटेल अशा खालील काही मुद्यांवर या प्रकरणात मनोवेधक अशी चर्चा आहे, तो मूळ पुस्तकातच वाचावयास हवी.

१. साथी मोहिउद्दीन हॅरिस यांच्या प्रतिगामी मतांचा निषेध.
२. सरदार पटेलांविषयीचे अनुभव–आझाद–पटेल मतभेद.
३. मौलाना आझाद वाटते तितके कर्मठ नव्हते.
४. प्रौढ सार्वत्रिक मतदान–इष्टानिष्टता.
५. विज्ञानातील नवे शोध–माणूसपण नष्ट होण्याची भीती.

या देशातील मुसलमानांच्या प्रश्नावर या संग्रहात तीन लेख असून या लेखातून मुस्लिमांच्या भारतद्रोही वर्तनाची, जेतेपणाच्या अहंकाराची आणि परिवर्तन–विरोधी धर्मवेडाची मीमांसा करून त्यास परखड उत्तरे दिली आहेत. पहिल्या दोन लेखात त्यांनी मुसलमानांना, 'आमचा मुसलमान नसण्याचा हक्क तुम्हास मान्य आहे की नाही' असा स्पष्ट सवाल विचारला आहे. मुसलमान नसणे मान्य असेल. कारण ती वस्तुस्थिती आहे. पण नसण्याच्या हक्कास मान्यता देणे याचा अर्थ काय होतो हे मुसलमानांनी लक्षात घ्यावे असे त्यांचे म्हणणे आहे. हा हक्क लक्षात न घेतल्यामुळे टॉयनबीच्या लेखावर दंगली होतात, रंगीला रसूल हे महंमद पैगंबराचे

चरित्र लिहिणाऱ्या राजपालांचा खून होतो आणि महंमदाचे चित्र छापणाऱ्या छाप-खान्यांना आगी लावल्या जातात. 'शेषम कोपेन पूरयेत' हा इस्लामी धर्मबांधवांचा नेहमीचा खाक्या आहे. कारण येथें प्रश्नांना उत्तरे नसतात. असली तरी गैरसोयीची असतात आणि त्यांना हे ठाऊक असते.

जमायते इस्लामीच्या नांदेड अधिवेशनात जो राष्ट्रीय एकात्मतेवर परिसंवाद झाला, त्यात प्रत्यक्ष भाग घेऊन प्रा. कुरुंदकरांनी मुसलमानांच्या विचारासाठी काही प्रश्न मांडले, ते फार महत्त्वाचे आहेत. इस्लामी बहुसंख्या असलेल्या सभेत हे परखड विचार मांडण्यास मोठे नैतिक धैर्य आणि विचारांची पक्की बैठक लागते. या दोन्ही गोष्टी कुरुंदकरांजवळ आहेत हे उघड आहे. पूर्वी निजाम राजवटीत काळ कंठलेल्या आम्हा मराठवाड्यातील लोकांना यात एक अपूर्वाई वाटते. का वाटते याची कारणे सांगण्यापेक्षा माझ्या वडिलांच्या बाबतीत घडलेली पन्नास वर्षां-पूर्वीची एक घटनाच येथे नमूद करतो. वडील बीड येथे सरकारी माध्यमिक शाळेत शिक्षक होते. एकदा मध्यंतरात टीचर्सरूममध्ये बसून काही मुसलमान शिक्षकांशी त्यांच्या गप्पा चालल्या होत्या. गप्पांचा ओघ अभावितपणे त्या दिवशी धार्मिक विषयाकडे वळला. आमच्या धर्मात असे सांगितलेले आहे, तुमच्या धर्मात तशी आज्ञा आहे, शरियत आणि मनुयाज्ञवल्क्य असे म्हणतात–इ. बाबी चर्चिल्या जात होत्या. तो एकदम एक मौलवी (उर्दू शिक्षक) रागावून आवेशाने उठून उभे राहिले व मुठी वळवून वडिलांना मोठ्याने म्हणाले, 'क्या करू मास्टरसाब, अगर मेरे पास इस वक्त खंजर होता तो मैं आपको बतला देता...' कोणतेही प्रक्षोभक कारण नसताना साध्या चर्चेतून आविष्कृत झालेला हा धर्मवेडाचा झटका पाहून हिंदू शिक्षक सुन्न झाले. म्हणून धार्मिक विषयावर मुसलमानांसमोर तोंड उघडण्याचा धीर करण्यास हिंदू धजत नसत. अनुदार, असहिष्णु अशा इस्लामी मनोवृत्तीचे हे प्रातिनिधिक उदाहरण ठरेल. स्वातंत्र्योत्तर काळात तरी तीत बदल झाला असल्याची चिन्हे दिसावयास हवी होती. श्री. हमीद दलवाई–ज्यांना प्रस्तुत पुस्तक अर्पण करण्यात आले आहे–यांना आलेल्या अनुभवावरून तसे दिसत नाही.

बहुसंख्याकांना शोभणाऱ्या उदारपणाने कुरुंदकर आम्हाला मुसलमान नसण्याचा (आणि ख्रिस्ती नसण्याचाही) हक्क आहे असे म्हणत आहेत. पुष्कळ हिंदूंना हे नकारात्मक विधान न पटून ते स्पष्ट assertive (ॲसर्टिव्ह) विधान करतील की आम्हाला हिंदू म्हणून रहावयाचे आहे तो आमचा हक्कच आहे. हिंदू समंजस, सर्व-समावेशक आहेत. सर्वांना समान नागरिकत्व असावे या गोष्टीस हिंदूंचा विरोध नाही. विरोध आहे असे कुरुंदकर म्हणतात तो, आपल्याच देशात दुय्यम दर्जाचे नागरिकत्व आम्हाला आमच्या अति औदार्याने येण्याचा संभव आहे म्हणून घेतलेला बचावाचा पवित्रा का मानू नये, या संदर्भात मुसलमान लोकांमध्ये अलीकडे तुरळक आढळणाऱ्या पुरोगामित्वाचे जनसंघाच्या नेत्यांनीही अभिनंदन करून स्वागतच केले आहे; हे लक्षात घेणे बरे. नाही तरी कुरुंदकर स्वतः मुसलमानांना

बजावीत आहेतच की, 'मला स्वतःला दुय्यम नागरिक करण्याचा प्रयत्न यशस्वी होऊ देण्यासाठी मीच मदत करीन या भ्रमात कोणी राहू नये.' 'याल तर तुमच्या-सह इ.' ही स्वातंत्र्यवीरांची ऐतिहासिक उक्ती निराळ्या संदर्भात होती. पण आजही धर्मनिरपेक्ष लोकशाहीची वाटचाल क्रमीत असताना ती उक्ती तंतोतंत लागू पडते. फुटीरवादाची, संसदेचे सार्वभौमत्व नाकारणारांची मनधरणी आम्ही कुठवर करणार आहोत? 'तुमचे सर्वांचे हृदयपरिवर्तन होईपर्यंत भारतीय लोक-शाहीच्या प्रगतीचा रथ थांबणार नाही; सुधारणा आणि समाजपरिवर्तनाचे कार्य तुमच्या संमतीची वाट पहात अडून बसणार नाही,' हे मुसलमानांना एकदा हडसून खडसून सांगण्याचे काम कुरुंदकरांनी केले आहे याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

जातीयवाद, सांप्रदायिकता हे शब्द चुकीच्या अर्थाने वापरले जात आहेत. ते तसे वापरून गुळगुळीत झाले असून त्यात गुळगुळीतपणा, अस्पष्टपणा आला आहे असे मला वाटते. जातीयवाद मग तो मुस्लिम, हिंदू, ख्रिश्चन कुणाचाही असो तो सर्वथैव सारखाच गर्हणीय, त्याज्य आहे असे आपण नित्य वाचतो, ऐकतो. यातून नक्की कोणता अर्थबोध होतो? हिंदू समाजातील शेकडो पंथ, जाती, उपजाती, त्यातील वैमनस्य, श्रेष्ठ-कनिष्ठ भाव, स्पर्शास्पर्श विचार, रोटीबेटीबंदी या कालबाह्य गोष्टींना जातीयवाद म्हणायचे व त्या टाकाऊ आहेत म्हणून धिक्कार करावयाचा येथपर्यंत ठीक आहे. इस्लामियातील शियासुन्नी वाद, ख्रिश्चनांतील कॅथॉलिक-प्रॉटेस्टट संघर्ष ह्यांचे स्वरूप असेच असल्याने त्यासही समानार्थाने जातीयवाद म्हणणे हेही समजू शकते परंतु पॅन-इस्लामिझम, जिहाद-ब-सैफ (धर्मप्रसारार्थ तलवार धारण करणे), तबलीग, लोभाने व बळाने बाटवाबाटवी, येशू ख्रिस्ताच्या संदेशाचा कोट्यवधी रुपये खर्चून करावयाचा प्रसार व प्रचार या निंद्य, आक्रमक, भारतराष्ट्रद्रोही प्रकारांनासुद्धा तेच नाव द्यावयाचे, जातीयवादच म्हणावयाचे, हे मोठे चमत्कारिक वाटते! सारख्या गोष्टींना सारख्या संज्ञा द्यावयास नकोत काय? इस्लाम व ख्रिस्टेन्डमप्रमाणे हिंदूंना या राष्ट्राच्या सीमांबाहेर कोठे श्रद्धास्थाने आहेत काय? देशावर प्रेम करणे ही जी कुठल्याही देशाच्या नागरिकाकडून केली जाणारी किमान अपेक्षा ती शंभर टक्के पूर्ण करणारा समाज फक्त हिंदूंचाच आहे. मग हिंदूंेतर आक्रमक व फुटीर राष्ट्रवादाची हिंदूंच्या अंतर्गत दोषांशी तुलना का? हिंदूंच्या भोंगळ विस्कळितपणाला आणि जातीजातींतील फुटीरपणाला जगात तोड नाही, तरी सेक्युलर वादाला, धर्मनिरपेक्ष समान नागरिकत्व असलेल्या लोकशाही जीवनाला सर्वांच्या तुलनेने तेच अधिक अनुकूल आहेत, किंबहुना हिंदी संविधानही आम्ही आमच्याच भविष्यासाठी निर्माण केलेली वाटचाल आहे, त्या मार्गाने पुढे जाण्याचे आम्ही एकमताने ठरविलेले आहे, असे म्हणणे जास्त बरोबर होईल. सर्व हिंदुधर्मीय एकाच जातीचे म्हणणे वस्तुतः ऐक्याच्या दृष्टीने उपकारक ठरले

असते. परंतु दुर्दैवाने तसे नसून हिंदूंतच अनेक जातीजमाती आहेत. सामान्य सुबुद्ध हिंदू नागरिकाला तो परंपराप्रिय असला तरी कालमानाप्रमाणे जातीभेद, अस्पृश्यता चातुर्वर्ण्य, इत्यादी अनिष्ट बाबी मनापासून नको आहेत. दलित वर्गावर आपण शकडो वर्षे अन्याय केले (होऊ दिले) या गोष्टींची त्यास सखेद जाणीव आहे. अस्पृश्यांना मिळणाऱ्या सोयीसवलतींना त्याचा विचारपूर्वक पाठिंबा आहे. कोणी जर असे म्हटले की आम्ही हिंदु शांततावादी, परमतसहिष्णु लोक आहोत, छळ करून वा जबरदस्तीने आम्ही कुणाला हिंदुधर्मात या असे म्हणत नाही. पारशांची जमात मुस्लिम छळाला कंटाळून कित्येक शतकांपूर्वी इराणमधून इकडे आली ती सुखाने अजूनही येथे नांदत आहे, म्हणून आम्हाला धर्मवेड्या ख्रिस्ती व इस्लामी राष्ट्रद्रोह्यांच्या पंगतीला बसवून तेवढेच निषेधार्ह ठरविणे कोणत्याही दृष्टीने न्याय्य नाही. तर याला काय उत्तर आहे? राष्ट्रवादी व राष्ट्रद्रोही यांत असलेला मूलभूत फरक जातीयवादी ह्या समान विशेषणाने दडवला जात आहे. राष्ट्रद्रोहाचे निंद्य स्वरूप यामुळे सौम्य होण्याचा धोका यात आहे. प्रा. कुरुंदकरांच्या या पुस्तकातही हिंदू जातीयवाद हा शब्द (१) हिंदूंनी एकत्र येऊन हिंद्वेतरांचा प्रतिकार करावा, हिंद्वेतरांना राजकीय व आर्थिक हक्क असू नयेत असे मानणाऱ्यांना आणि (२) अस्पृशांना हक्क नाकारणाऱ्या सनातनी, परिवर्तनविरोधी, परंपरावादी हिंदू लोकांना जसा वापरला आहे त्याचप्रमाणे (३) नेतेपणाचा अहंकार, असहिष्णुता, अनुदारपणा यांनी युक्त व देशावर निष्ठा न ठेवणाऱ्या आक्रमक मुसलमानांच्या धर्मवेडालाही मुस्लिम जातीयवाद हा शब्द समानार्थाने वापरला आहे, यात मला अतिव्याप्ती जाणवते, म्हणून थोडे विस्ताराने लिहिले.

वास्तविक या आधुनिक युगात कोणत्याही प्रचलित धर्माचे, पंथाचे (मला आचारधर्म अभिप्रेत आहे, तत्त्वज्ञान नव्हे) समर्थन करणे हे फार अवघड नव्हे अशक्य काम आहे. त्यातून प्रत्येक धर्माचा जुना इतिहास तर अधिकच मानवताविरोधी राहिलेला असल्याने असमर्थनीय ठरतो. एक दिवस असा उगवेल का देश, धर्म यांचे अडसर ओलांडून सर्व मानवजात मानवता हाच सर्वश्रेष्ठ धर्म मानील आणि परस्पर–सौहार्दाने राहील हे प्रत्येक विचारवंताचे ध्येय असते. अनंत काळापासून माणूस हे स्वप्न पाहत आला असला तरी असून ते नजीकच्या, दृष्टिपथातही आलेले नाही. जीवनातील 'शिव' या मूल्यावर श्रद्धा असल्याचे कुरुंदकरांनी पुस्तकाच्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. 'रूपवेधा'चा 'मागोवा' घेताना काय अगर 'शिवरात्री'चा 'जागर' करताना काय त्याच्या डोळ्यापुढेही असलेच काहीतरी भव्योदात्त स्वप्न तरळून जात असले पाहिजे असे हे पुस्तक संपवून खाली ठेवल्यावर मनास जाणवत राहते.

□

शिवरात्र : प्रा. नरहर कुरुंदकर : साधना प्रकाशन, पुणे ३०

किरण ठाकर । मुक्काम दिल्ली

# एक तमाशा अच्छा खासा

अरुण जोगळेकर—सई परांजपे आणि त्यांचा कपू म्हणजे राजधानीत साहित्य—कला, विशेषत: नाट्य क्षेत्रात नवनवीन प्रयोग करणाऱ्या महाराष्ट्रीयातील प्रमुख नावं.

सई—अरुण दुक्कलीचं पितृत्व सांगणारा 'एक तमाशा अच्छा खासा' जाहिरातीत वाचला, तेव्हा काहीतरी वेगळं पहायला मिळणार अशी खात्री दिल्लीतील महाराष्ट्रीय—बिगर महाराष्ट्रीयांना पटली असावी. कारण नाट्यगृहाकडे मुंबई—पुण्याकडे असते तितकी गर्दी अभावानेच करणारा दिल्लीकर या प्रयोगाला दिसला.

सई परांजपेंनी लिहिलेल्या या हिंदी तमाशाचा उद्देश या अस्सल मराठी करमणुकीचा इतरांना परिचय करून देणे एवढाच आहे, असं सांगण्यात आलं. प्रत्यक्षात प्रेक्षकांनी दिलेल्या उत्स्फूर्त दादेवरून त्यांचा परिचय तर झालाच, पण दोन तासांची निर्भेळ करमणूकसुद्धा झाली असं मला तरी वाटलं. त्या अर्थाने तमाशाने नावाशी इमान राखलं.

मुळात 'ग्रामीण' असलेला हा प्रकार यापूर्वीच 'लोकनाट्य' बनून महाराष्ट्रात लोक व राजमान्य झाला आहे तर सई—अरुण आणि सादरकर्ते यात्रिक—इंडियन नॅशनल थिएटर्सनी आता दिल्लीही आकर्षून घेतली.

कुठल्याही तमाशाप्रमाणे 'एक तमाशा अच्छा खासा'ला तसे जबरदस्त कथानक नाही. एक राजा आपण लवकरच मरणार या कल्पनेने ग्रासून गेलेला. त्याचा बरकी प्रधान एका बेकार नटाच्या सहाय्याने एक कट करतो. या नटाला हिमालयावर साधूचा वेष देऊन प्रधान राजाला तेथें घेऊन जातो. हे 'ढोंगेश' महाराज खूपशी दक्षिणा घेऊन भविष्य वाणी गरजतात 'प्रधानाच्या मृत्युनंतर दोन तासांनी तुझा मृत्यु होणार आहे.' मग राजा प्रधानाची काळजी घेऊ लागतो. प्रधानाच्या मागण्या वाढायला लागतात. राजकन्येचीही मागणी करतो !

आता प्रकृतीची देखभाल करायची असते प्रधानाची. राजवैद्याला बोलावणे जाते.

करवती, कुन्हाड यांच्या सहाय्याने ऑपरेशनची तयारी होते. बाजू उलटलेली पाहून प्रधान खरं काय ते सांगून टाकतो. राजा संतापून त्याला फाशीची शिक्षा देतो. शेवटी महाराणीच्या वशिल्याने त्याला मरणाच्या प्रकाराची निवड करण्याची संधी मिळते. तो मागतो वृद्धापकाळाने नैसर्गिक मरण !

अशी ही सरळधोपट कथा सई परांजपेंनी लिहिली आहे मोठी छान. गवळणीचा भाग थोडा अनाकर्षक झाला असला तरी वग सुरू झाल्यानंतर मात्र रंगत सारखी वाढत जाते.

दिल्लीतला आपला प्रेक्षक बुद्धीमान आणि 'सोफॅस्टिकेटेड' आहे याची जाणिव असल्यामुळे त्यांच्या विनोदाची पेरणी मोठी मजेशीर वाटते. गवळणीनंतर तमाशाचे प्रास्तविक सांगताना एक दुसऱ्याला म्हणतो, 'आता बकबक बंद कर. लोक बोअर होतील–' त्यावर दुसरा उत्तरतो, 'घाबरू नको, भारतीय लोकच आहेत ते...' क्षणभर विनोद डोक्यावरून जातो काय असं वाटलं. पण मग लगेच नाट्यगृह हास्याने भरून गेले.

दुसरा एक विनोद तसाच प्रभावी वाटला. राजा त्या बेरकी प्रधानाला मृत्युची 'चॉईस' देतो, 'फासी मांग सकते हो, या जहर का प्याला मांग सकते हो, चाहो तो खाई में ढकले दूंगा–' मग थांबून आणखी एक पर्याय सांगतो, 'या कलकतेमें जाकर इलेक्शन लड सकते हो.'

नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचा पदवीधर असलेला बेकार नट हिमालयात जायला नाही म्हणतो तेव्हा प्रधान त्याला अनेक शपथा घालतो. शेक्सपीयरची शपथ घालून पहातो. पण ऊ हूँ ! अल्काझींची शपथ घालताच मात्र तो लगेच तयार होतो !

या तमाशात संगीत ही लंगडी बाब. पण त्याच्या मर्यादा स्पष्ट होत्या. स्वत: जोगळेकरांचा आवाज ठीक होता. चारु जैन या अमराठी अभिनेत्रीच्या नृत्यातला ठसका अस्सल वाटण्याइतपत सुरेख होता.

तमाशाचे दिग्दर्शन ही तशी फार कौशल्याची बाब. सई–अरुण या दोघांनीही हा नाट्य प्रकार विलक्षण सफाईने पेश केला. कुठेही तोल जाऊ न देता, वाह्यातपणा होऊ न देता त्यांनी कलाकारांकडून सफाईने कामे करून घेतली.

बेरकी प्रधानाची भूमिकाही अरुण जोगळेकर यांनीच केली. भूमिकेचे बेअरिंग किंवा 'नस' त्यांना बरोबर सापडली. वेगवान हालचाली, संवादाची फेक हे त्यांना छानच जमले. त्यांचे साथीदार चानी बेदी (ढोंगेश), राजवैद्य (नरेंद्र डेंगळे) यांची साथ सुरेख होती. गोविंद देशपांडे (राजा) यांच्या उत्कृष्ट भूमिकेचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे.

कौतुकाची गोष्ट म्हणजे महाराणी व नर्तिकेचे काम करणाऱ्या अभिनेत्री (मधू

राजा व चंपक जैन) दोघीही अमराठी. पण दोघींचाही या तमाशातला वकुब मात्र दांडगा.

एकंदरीत सर्वच संच इतका छान जमला होता की मंडळी नुकतीच कोल्हापूरचा फड गाजवून इथे नाईलाजाने हिंदीतून बोलताहेत असं वाटावं

प्रयोगानंतर सई परांजपेंना म्हणालोसुद्धा ' विच्छा माझी 'ची आठवण झाली म्हणून. त्यांच्या ' थँक्यू 'वरून हे तोंडदेखले कौतुक आहे असं त्यांना वाटल्याचं दिसलं.

माझ्या शेजारचा गुजराती आणि सरदारजीसुद्धा दोन तास खदखदून हसत होते, एवढं सांगायला मी विसरलो, ते चुकलं !

□ □ □



शरद गोखले

## चित्रपट

# सोंगाड्या

' विच्छा ' फेम शाहीरदादा कोंडके हे ' सोंगाड्या ' या आपल्या चित्रपटाने मराठी चित्रपटसृष्टीत प्रवेश करीत आहेत. मराठी रसिकांनी दादांचे ' विच्छा माझी पुरी करा ' हे लोकनाटय अक्षरशः डोक्यावर घेतले. या लोक–नाटयातून मिळालेला पैसा अनेकांचा सल्ला धुडकावून दादांनी या चित्रपटासाठी खर्च केला आणि एक नवीन धाडस केले.

सविच्छा चित्र या बॅनरखाली तयार करण्यात आलेल्या या चित्रपटाची कथा वसंत सबनीस यांची असून पटकथा व संवादही त्यांचेच आहेत. चित्रपटामध्ये शाहीर दादा कोंडके हे मुख्य भूमिका करणार हे डोळ्यासमोर ठेवून त्यांना प्राधान्य मिळेल अशा पद्धतीने पटकथा लिहिण्यात आली आहे..नामदेव हा एक भोळा-भाळा प्राणी. आईच्या धाकात राहून दिवसभर शेतावर काम करावे आणि शांतपणे एकमार्गी जीवन जगावे अशा पद्धतीने वागणाऱ्या या नाम्याला मित्र बत्ताशा प्रथमच तमाशाच्या फडात घेऊन जातो. फड हालल्यावर थापेबाजी करून बत्ताशा नामदेवलाही फडाबरोबर पाठवून देतो. तमाशा ऐन रंगात आलेला असतो. द्रौपदी–वस्त्रहरणाचे दृश्य चालू असते. कृष्णाचा पत्ता लागत नाही हे पाहून नाम्या तडक फडात घुसतो आणि द्रौपदी–वस्त्र हरणात मग्न असलेल्या कौरव मंडळींना यथेच्छ मारपीट करतो. आपला पोरगा तमाशाला जातो हे पाहून म्हातारी बिथरते आणि नामदेवाला घराबाहेर काढते. योगायोगाने नामदेव पुन्हा कलावतीच्याच फडात येतो. त्याला त्याचे हुकमी क्षेत्र सापडते. सोंगाड्या म्हणून नामदेव नावारूपास येतो. आलेल्या संकटावर मात करून कलावती आणि नामदेव स्वतंत्र फड काढतात. आपल्या क्षेत्रात मानमान्यता मिळवतात. पैशाचा ओघ सुरू होतो. कलावती आणि नामदेव मिळून तमासगिरांच्या मुलांसाठी मोठी शाळा बांधतात. बत्ताशा ही बातमी म्हातारीला सांगतो. आपल्या मुलाचे नाव पेपरात झळकलं म्हणून खूष झालेली म्हातारी व दोस्त बत्ताशा समारंभात दाखल होतात. म्हातारीला पाहून नामदेव खूष होतो. पोरगा हातचा जाऊ नये म्हणून म्हातारी नामदेवचे लग्न लावायचे ठरवते आणि कलावतीच्या सहवासात राहूनही भोळाभाबडा राहिलेल्या नामदेव-समोर ' कलावती 'लाच त्याची भावी पत्नी म्हणून उभी करते.

वसंत सबनीसांची पटकथा साधी सरळ आहे. संवादही सोपे आणि आकर्षक

आहेत. गीतांची बाजू वसंत सबनीस, दादा कोंडके यांनी समर्थपणे सांभाळली आहे. आपली कथा ही दादांसाठी आहे याचा त्यांना किंचितही विसर पडलेला नाही. तमाशातील दृश्य अतिशय वास्तव स्वरूपात त्यांनी रंगवली आहेत. नामदेवचे 'भोळा–बालपन' काही वेळा अतिरंजित वाटले तरी जी एक विशिष्ट पट्टी लेखकाने पकडली आहे ती शेवटपर्यंत कायम ठेवल्याने त्यामध्ये विसंगती जाणवत नाही.

कलाकारांमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी अर्थातच दादा कोंडके यांची. वाढते वय आणि कॅमेऱ्याला काहीसा त्रासदायक असणारा चेहरा या दोन अडचणींवर त्यांनी आपल्या उपजत अभिनय कौशल्याने मात केली आहे. त्यांचा भोळा—भाबडा नामदेव मराठी रसिकांच्या दीर्घकाल लक्षात राहील. कलावतीचे काम करणाऱ्या उषा चव्हाण यांना चित्रपटात त्या मानाने चांगले स्थान आहे. बाईंनी आपल्या वाट्याला आलेली भूमिका मन लावून केली आहे. त्यांची नृत्ये मोहक आहेत. अभिनयाची बाजूही त्यांनी समाधानकारकपणे संभाळली आहे. बताशाच्या छोट्या भूमिकेत निळू फुले मस्त मजा करतात. रत्नमालाबाईंच्या वाट्याला आलेली नामदेवच्या आईची भूमिका त्यांनी चांगल्याप्रकारे साकार केली आहे. चित्रपटातील अन्य यशवंत कलाकार लक्षात न राहण्या इतके नगण्य आहेत.

तांत्रिक बाजूपैकी सर्वोत्कृष्ट कामगिरी अरविंद लाड यांची. मराठी चित्रपटातील सर्वसाधारण छायालेखनाचा दर्जा लक्षात घेतला तर लाड यांच्या कामगिरीचे महत्त्व विशेषत्वाने जाणवते. छाया चित्रणातील सफाई त्यांनी छान संभाळली आहे. राम कदम यांचे संगीत चित्रपटाचा मोठा असेट ठरावे. 'माळ्याच्या मळ्यात कोण ग उभी, वांगी तोडते मी रावजी' हे व 'काय ग सखू' ही दोन गाणी हीट ठरतील अशी अपेक्षा आहे. अन्य गाणीही त्यांनी चांगली बांधली आहेत.

चित्रपटाची ध्वनि–संकलनाची बाजू त्रासदायक वाटते. दिग्दर्शक या नात्याने गोविंद कुलकर्णी यांनी चांगली कामगिरी बजावली आहे. हाती आलेल्या विषयाची खुबीने मांडणी करून त्यांनी चित्रपट मनोरंजक केला आहे. विशेषतः पहिला अर्ध गतिमान व चांगला वाटतो.

तमाशावरील अनेक चित्रपट गेल्या काही दिवसात आले. किंबहुना सतत येतच असतात. दादांचा हा सोंगाड्या मात्र अनेक दृष्टीनी वेगळा व सरस असल्याने प्रेक्षकांनी अवश्य पहावा असे सुचवावेसे वाटते.



**पंडित वि. म. जोशी**
**ज्योतिष विशारद**

---

**२० ते २६ मार्च १९७१**

**मेष :** शरीर प्रकृती चांगली राहील. पैशाची जरा ओढाताण होईल. प्रवास योग शनिवार रविवारी आहे. घरात थोडासा मतभेद होईल. अचानक धनलाभ होईल. थोडेसे प्रेमाच्या लफड्यात सापडण्याचा योग आहे. हा योग सोमवार मंगळवारी येईल. स्वभाव आग्रही होईल.

विद्याभ्यासात थोडीशी माघार घ्यावी लागेल. सरकारी नोकरीत असलेल्या मुलाची जरा दूरच्या गावी बढतीवर बदली होण्याचा योग आहे. बुधवार गुरुवार शुक्रवार भागीदारीतील व्यवसायात मतभेद निर्माण होतील. त्याकरता कोर्टकचेरी करण्याची वेळ येईल. उद्योग धंदा साधारणच चालेल. शुभ तारखा २०।२१।२४।२५.

**वृषभ :** शरीर प्रकृती जरा नरमच राहील. वात विकारापासून त्रास होण्याचा योग आहे. धनस्थिती चांगली राहील. सरकारातून येणारा पैसा हातात पडेल. पाठच्या भावंडाकडून त्रासदायक वागणूक होईल. सोमवार मंगळवारी हा अनुभव येईल. प्रवास घडेल. प्रवासात थोडासा त्रास होईल. शक्य तर प्रवास टाळावा.

विद्याभ्यासात भरघोस यशप्राप्ती होईल. लेखक, प्रकाशक, शास्त्रज्ञ, ज्योतिषी वगैरे बुद्धीजीवी लोकांना त्यांच्या व्यवसायात प्रगतीकारक दिवस आहेत. अधिकाराला थोडासा कमीपणा येण्याचा संभव आहे. साडेसातीचा जरासा त्रास होईल. सप्तमातील गुरु सर्व संकटे निवारण करील. शुक्रवारी अमावास्या आहे. तरी तो दिवस फार चांगला जाईल. शुभ तारखा २४।२५।२६.

**मिथुन :** शरीर प्रकृती चांगलीच राहील. पैशाची आवक चांगली होईल. पराक्रमाने पत वाढेल. कर्तबगारीला सरकारकडून मदत होईल. थोडासा अपचनाचा विकार होण्याचा संभव आहे. सहाव्या घरातला गुरु धनस्थान व दशमस्थानावर पाहतो आहे. हा योग अत्यंत शुभफलदायी आहे.

विद्येत अपयश येईल. गुरु-शुक्र-कारक अधिपती अशुभ स्थानात आहेत. संततीची वागणूक अतिशय त्रासदायक होईल. बुधवार नंतर त्यात थोडासा फरक पडेल. पत्नीकडून थोडीशी मनाविरुद्ध वागणूक होईल. घरात काही शुभ कार्य होईल. व्यापार धंदा चांगलाच चालेल. शत्रूंचा पराभव होईल. शत्रूसुद्धा आयत्यावेळी सर्व प्रकारची मदत करतील. शुभ तारखा २०।२१।२४।२५।२६.

**कर्क :** शरीर प्रकृती चांगली राहील. हातून पराक्रम घडेल. आध्यात्मिक विचार वाढतील. शनिवार रविवारी सार्वजनिक कामात भाग घ्यावा लागेल. घरात सुख

समाधान वाढेल. धनस्थिती सुधारेल. येणाऱ्या रकमा हातात पडण्याचा योग आहे. घरात वृद्ध माणूस-माता अगर पिता—आजारी पडण्याचा योग आहे.

विद्याभ्यासात यश प्राप्ती होईल. मेडिकलचा अभ्यास करणाऱ्यांना असलेल्या अडचणी नाहीशा होतील. मिलिटरीतील अधिकाऱ्यांना बढती मिळण्याचा शुभ योग आहे. गुरु मंगळाचा अन्योन्य योग फार चांगला आहे. शत्रूनाश होईल. उद्योग धंद्यात अडचणी निर्माण होतील. विशेष करून वाहतुकीचा धंदा करणारांना त्रास होईल. शुभ तारखा २०।२१।२२।२६.

सिंह : शरीर प्रकृती जरा नरमच राहील. कारकाधिपति एकच रवी अष्टमात आहे. त्याचेजवळ एकादशेश व धनेश बुध आहे. त्यामुळे अचानक चांगलाच धनलाभ होईल. ३२ ते ३६ वयातील व्यक्तींना हा अनुभव जास्त येईल. घरात काही तरी शुभ समारंभ होईल. धार्मिक विधी होण्याचा ज्यास्त संभव आहे.

विद्याभ्यासात मनाप्रमाणे प्रगती होईल. यांत्रिक अगर मेडिकल अभ्यास करणारांना ज्यास्त यश प्राप्त होईल. २८ ते ३२ वयातील व्यक्तिच्या हातून काहीतरी संशोधन कार्य होईल. संततीचा उत्कर्ष होऊन त्यांची वागणूक सुखदायक होईल. व्यापार धंदा साधारणच चालेल. फॅन्सी मालाच्या व्यापाऱ्यांना व्यापारात खोट येईल. शुभ तारखा २०।२१।२४।२५।२६.

कन्या : शरीरप्रकृती अत्यंत चांगली राहील. धनस्थानाची स्थिती त्रासदायक असेल. व्यसनाकरता पैसा खर्च होईल. भावंडांची चांगली मदत होईल. घरात विवाहाच्या वाटाघाटी होतील. ३२ ते ३६ वयाच्या व्यक्तींना हा अनुभव जास्त येईल. घरात सोमवारी-मंगळवारी मतभेद निर्माण होतील.

विद्याभ्यासात अपयश येईल. संततीकरता पैसा खर्च करावा लागेल. शत्रूनाश होईल. सरकारी कामात यश मिळेल. साहित्यिक, प्रकाशक, पुस्तकाचे व्यापारी यांना नवी सरकारी कामे मिळण्याचा शुभयोग आहे. भागीदार अत्यंत सचोटीने वागतील. धाडसाची कामे हाती घेतल्यास त्यात यशप्राप्ती होईल. मित्रपरिवार थोडासा नीट वागणार नाही. शुभ तारखा २०।२१।२४।२५.

तूळ : शरीरप्रकृती चांगली राहणार नाही. वातविकार होण्याचा योग आहे. धनस्थिती चांगलीच राहील. पराक्रमाने अमाप पैसा मिळेल. सुखनाश होईल. थोडक्या कारणाकरता घरात भांडणे होतील. यात्रेकरता प्रवासाचा योग आहे. विवाहाचा योग येईल. या वाटाघाटी शनिवारी-रविवारी होतील. प्रेमविवाह जमण्याचा योग आहे. २७ ते ३१ वयातील व्यक्तींना हा योग जोरदार आहे.

विद्याभ्यासात यशप्राप्ती होईल. शेतकी, इंजिनिअरिंग वगैरे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना भरघोस यश मिळेल. संततीचा उत्कर्ष होईल. ३६ वयाच्या पुढील व्यक्तींना उद्योग धंद्यात अगर नोकरीत अनपेक्षित प्रगती होईल. अचानक धनलाभ होईल. लॉटरीचे तिकिट घ्यावे. २४।२५ तारखा या दृष्टीने चांगल्या आहेत. विशेषतः एजन्सीची

कामे करणारांना दिवस अत्यंत प्रगतीकारक आहेत. सर्व सप्ताहच शुभफलदायी.

वृश्चिक : शरीरप्रकृती चांगलीच राहील. धनस्थितीत अपेक्षित सुधारणा होईल. सोमवारी-मंगळवारी प्रवासाचा योग येईल तो टाळावा. घरात थोडासा मतभेद होईल. भावंडांसह मातुल घरी जाण्याचा योग आहे. भोळेपणानी एखाद्या व्यवहारात नुकसान होण्याचा योग आहे. सार्वजनिक कामात निश्चितपणे यशस्वी होता येईल.

विद्याभ्यासात अभूतपूर्व यश येईल. कोणत्याही परिक्षेत मनासारखे घडून येईल. चढाओढीच्या परीक्षांतून हमखास निवड होईल. संततीची प्रगती होईल. कन्या असतील त्यांचे विवाह अचानक जमण्याचा योग येईल. सर्व गोष्टी मनासारख्या होतील. इतके दिवस भोगलेल्या यातनाचे फल प्राप्त होईल. "क्लेशः फलेनहि पुनर्नवतां विधेत्ते." शुभ तारखा२०।२१।२४।२५।२६.

धन : शरीरप्रकृती जरा नरम राहील. अपचनाच्या विकाराचा त्रास होईल. सुखनाश होईल. लग्नेश–चतुर्थेश गुरू व्ययात आहे तो अशुभ फलदायी आहे. मात्र चतुर्थस्थानावर पंचम दृष्टीने पाहतो त्यामुळे त्याची वाईट फळे कमी मिळतील. धनस्थानातील राहू-शुक्र पैसा वारेमाप खर्च करावयाला लावतील. शब्दात अत्यंत कठोरपणा येईल.

विद्येत संपूर्ण अपयश येईल. पंचमातील शनी शिक्षणातील अडचणी वाढतील. संतती नीट वागणार नाही. सरकारी कामात यश प्राप्त होईल. शनिवारी-रविवारी अचानक धनलाभ होईल. विवाहाला आपोआप मागणी येईल. याबद्दल वाटाघाटी होतील. उद्योगधंद्यात संपूर्ण यश मिळेल. ३२ ते ३६ वयातील व्यक्तींना विवाहयोगाचा जास्त अनुभव येईल.सबंध सप्ताह शुभफलदायी आहे.

मकर : शरीरप्रकृतीत मूत्र विकाराचा त्रास होईल. स्वभावात हेकटपणा वाढेल. पैशाची स्थिती सुधारेल. अकरावा गुरू शुभ फलदायी आहे. घरात भावंडांशी कलह होईल. घरात वृद्ध माता-पित्यांपैकी कोणीतरी आजारी पडेल. प्रवासयोग येईल. प्रवासात कायम स्वरुपाच्या चांगल्या घटना घडतील. बारावा मंगळ त्रासदायक आहे.

विद्याभ्यासात संपूर्ण यश प्राप्त होईल. संततीचा उत्कर्ष होईल. सरकारी नोकरांना बढतीवर व आपल्या आवडत्या जागेवर बदल्या मिळतील. मनात थोडेसे आत्मघातकी विचार येतील. पत्नीकडून अगर पतीकडून संपूर्ण सहकार्य मिळेल. मित्रपरिवार मदतीला धावून येईल. व्यापारधंदा अत्यंत चांगला चालेल. हातात घेतलेले कोणतेही काम तडीला जाईल. शुभ तारखा २०।२१।२३।२४।२५.

कुंभ : शरीरप्रकृती चांगली राहील. पैशाच्या अडचणी लवकरच नाहीशा होतील. दहावा गुरु पंचम दृष्टीनी धनस्थानावर पहातो. शिवाय ते एकादशेश आहे व धनस्थान त्याचे स्वतःचे घर आहे. प्रवासयोग येईल. त्यात भाग्योदयकारक गोष्टी होतील. सुखात व्यत्यय येईल. घरात भांडणे होतील. भाग्याला कमीपणा येईल. ४२ च्या पुढील व्यक्तींना याचा जास्त अनुभव येईल.

विद्याभ्यासात प्रगती चांगली होईल. साहित्यिक, लेखक, प्रकाशक, ज्योतिषी व इतर बौद्धिक व्यवसाय करणारांची प्रगती चांगलीच होईल. सरकारकडून सर्व

बाजूंनी मदत मिळेल. मित्र उपयोगी पडतील. प्रेमाच्या प्रकरणात गुंतण्याचा संभव आहे. २८ ते ३२ वयातील व्यक्तींना हा योग जास्त आहे. सोमवार-मंगळवार लग्नाची मागणी येईल ती स्वीकारावी. शुभ तारखा२०।२१।२४।२५।२६

मीन : शरीरप्रकृती चांगली राहील. नववा गुरु धनस्थितीत अपेक्षित सुधारणा घडवून आणील. धनेश व भाग्येश मंगळ दशमात व लग्नेश दशमेश भाग्यात हा योग अत्यंत चांगला आहे. प्रवासयोग येईल. त्यात शास्त्रीय शिक्षण घेण्याचा योग येईल. घरात शनिवार-रविवार काहीतरी शुभ समारंभ होईल. परगावी असलेली मुले भेटतील.

विद्याभ्यासात भरघोस यश येईल. शास्त्रीय विषयात जास्त प्रगती होईल. अध्यात्मिक विचार वाढतील. मानमान्यता प्राप्त होईल. बुधवारी-गुरुवारी शुक्र कुंभेत गेल्यावर मालायोग पूर्ण होत आहे. या योगावर काहीतरी मोठा धनलाभ राजमान्यता मिळण्याचा जोरदार योग आहे. साडेसातीचा शेवट आहे. पुढील यशस्वी जीवनाचा उषःकाल दिसून येईल. सर्व सप्ताह शुभफलदायी आहे ◻ ◻ ◻


**विनोद मेहरा व योगिताबाली या तरुण नवकलावंतांच्या**

अभिनयाने सजलेले रहस्य चित्र

एम सी आर फिल्म्स (मद्रास) कृत

# पर्दे के पीछे

गेवाकलर

| दिग्दर्शक | संगीत | संवाद-गीते |
|---|---|---|
| **के. शंकर** | **शंकर जयकिशन** | **राजेंद्र कृष्ण** |

सोबत : प्राण, बिंदु, पद्मा, जगदीप

| **शालिमार** | **रेक्स** | **लोटस** | **पॅलेस** |
|---|---|---|---|
| ३, ६, ९ | १२, ३, ६, ९ | १२, ३, ६, ९ | १२, ३, ६, ९ |

| **रिव्होली** | **रूपम** | **नंदी** | **मीलन** | **नवरंग–संगम** |
|---|---|---|---|---|
| १२, ३, ६, ९ | ३, ६, ९ | (वांद्रे) | (सांताक्रूझ) | (अंधेरी) |

**जोहरा** (मालाड), **टोपीवाला** (गोरेगांव), **हंजर** (जोगेश्वरी), **जया** (बोरिवली) **नटराज** (चेंबूर), **कल्पना** (कुर्ला), **श्रेयस** (घाटकोपर), **जवाहर** (मुलुंड), **कृष्ण** (भांडूप), **अशोक** (ठाणे), **प्रकाश** (कल्याण), **सपना–प्रभात** (उल्हासनगर)

–लकी फिल्म्स प्रकाशन



[illegible] प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. वा. [illegible] यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. बा. म. [illegible]

माणूस

# गरीबी हटाव विशेषांक

तपशील पुढील अंकी

MANOOS ( Biweekly ) : 40 Paise : Regd. No. M-H 649